

मासिक वार्तापत्र • अंक 18 • एप्रिल 2021 • सहयोग मूल्य - रु. 5 • 12 पाने

# कामगार बिगुल

नव्या समाजवादी क्रांतीचा उद्घोषक

मोदी सरकारचे नवीन चार कामगार कायदे ! 5

पॅरिस कम्युन: पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा 7

हरियाणामध्ये स्थानिकांना नोकरीत आरक्षणाचा कायदा 12

## कोरोनाच्या मृत्यूतांडवाला पाहून हताश, निराश न होता

## भांडवली व्यवस्थेला गाडण्यासाठी, आरोग्यव्यवस्थेच्या राष्ट्रीयीकरणासाठी लढण्यास सज्ज व्हा!

**एका अभूतपूर्व अशा मृत्यूतांडवातून देश जात आहे.** कोव्हिड-19 च्या प्रचंड मोठ्या दुसऱ्या लाटेने आरोग्यव्यवस्थेची, विकासाच्या खोट्या चित्राची लक्तरं काढली आहेत. ऑक्सिजन वाचून तडफडून जाणारे जीव, बेडकरिता दिवसेंदिवस धावपळ करूनही इलाजाविना मरणारे आपले भाऊ-बहिण, प्लाझ्मावाचून किंवा रेमडेसिवीर-टॉसिलीझुमॅब सारख्या औषधांवाचून किंवा त्यांच्या लाखावर पोहोचलेल्या काळ्या बाजारातल्या किमती न परवडल्यामुळे जाणारे जीव, स्मशानात अहोरात्र पेटलेल्या चिता, अग्नी देण्याकरिता किंवा दफन करण्याकरिता सुध्दा लागलेल्या रांगा, रुग्णालयांच्या बाहेर चाललेले आक्रोश, सोबत ऑक्सिजन सिलेंडर घेऊन रुग्णालयावर फूटपाथवर झोपलेले रुग्ण, ॲम्ब्युलन्सच्या सायरनचे न थांबणारे आवाज, लॉकडाऊनमध्ये सरकारी मदतीवाचून भुकेने कळवळणारी बाळं अशी सर्व चित्र मनाचा थरकाप उडवणारी आणि संताप आणणारी आहेत. अशातच महाराष्ट्रामध्ये नाशिक, भांडुप, विरार मध्ये झालेल्या कोव्हिड हॉस्पिटल्स मधील अपघातांनी संतापाची तिडीक निर्माण केली आहे.

इथे फक्त ‘व्यवस्था’ अपयशी ठरलेली नसून, नफ्याकरिता चालणारी आरोग्य व्यवस्था अशीच असू शकते हे समजणे आवश्यक आहे. हे भांडवली उत्पादन व्यवस्थेचे संरचनागत अपयश आहे ज्याला सत्तेत बसलेल्या फॅसिस्टांच्या मानवद्रोही कारनाम्यांमुळे अजून भीषण रूप आले आहे.

**केंद्र आणि राज्य सरकारांचे दुसऱ्या लाटेकडे दुर्लक्ष!**

कोव्हिड-19ची दुसरी लाट येणार हे सूर्यप्रकाशाएवढे साफ होते. तयारीसाठी वर्षभरापेक्षा जास्त काळ मिळालेला होता. नोव्हेंबर

संपादक मंडळ

2020 मध्येच आय.सी.एम.आर. चे वैज्ञानिक समिरन पांडा यांनी दुसऱ्या लाटेबद्दल धोक्याचा इशारा दिला होता. कर्नाटकमध्ये नोव्हेंबर महिन्यात एका समितीने इशारा दिला होता की एप्रिल-मे महिन्यात दुसरी मोठी लाट येऊ शकते. युरोपातील अनेक देशांमध्ये कोव्हिडची दुसरी लाट येऊन गेलेली होती आणि नुकसानही करून गेली होती. इंग्लंडसारख्या विकसित देशामध्ये डिसेंबर-जानेवारी मध्येच दुसरी लाट येऊन गेली होती आणि ती पहिल्या लाटेपक्षाही मोठी होती. इतकेच नाही तर केंद्र सरकारनेच नेमलेल्या ‘एम्पावर्ड ग्रुप 6’ ने ऑक्सिजनच्या तुटवड्याबद्दलही इशारा एप्रिल 2020 मध्येच दिलेला होता. यानंतर फक्त ऑक्सिजन संदर्भात एक 9 सदस्यीय समितीही बनवली गेली. तरीही देशातील, राज्यातील आरोग्ययंत्रणा या संकटासाठी तयार नव्हती हे आता अगदी स्पष्ट आहे. या काळात केंद्र सरकार काय करत होते?

फेब्रुवारी महिन्यामध्ये भाजपने मोदींचे कौतुक करत ठराव पास केला होता की मोदींच्या नेतृत्वातील भारताने जगासमोर कोव्हिडशी लढण्याचे उदाहरण प्रस्तुत केले आहे. यानंतर मोदींनी फेब्रुवारी मध्ये म्हटले की “कोव्हिड लढाईबद्दल भारताकडून सगळी दुनिया प्रेरणा घेत आहे.” मार्च महिन्यात केंद्रीय आरोग्यमंत्री हर्षवर्धन यांनी म्हटले की “कोव्हिडच्या लढाईत आपण आता जिंकण्याच्या शेवटच्या टप्प्यात आहोत.” तर आसाममधील भाजपचे नेते हेमंत बिस्व शर्मा यांनी आता मास्कची गरज नाही असे एप्रिलच्या सुरूवातीला म्हटले होते.

इतकेच नाही तर देशामध्ये जगातील सर्वात मोठी अशी दिवसाला 3 लाख पेक्षा जास्त कोव्हिड-19 केसेसची वाढ नोंदवली गेली. हे होत असताना पश्चिम बंगालमध्ये निवडणुकीच्या सभा कोरोना-संसर्गाचे सर्व नियम धाब्यावर बसवून धुमधडाक्याने होत होत्या. भाजप, तृणमूल काँग्रेस, सीपीएम कोणीही यात मागे नव्हते. भाजप आणि

पान 6 वर

## देशभरात लपवले जात आहेत कोरोना मृत्यूचे आकडे !

✍ - अभिजित

कोव्हिड-19 मुळे आत्तापर्यंत देशात जवळपास 1,89,000 मृत्यू झाल्याचा आकडा आहे. जगभरामध्ये या आजारामुळे 31 लाखांपेक्षा जास्त लोकांचा जीव आत्तापर्यंत गेला आहे. ब्राझिलमध्ये दर 100 केस मागे 2.71 लोकांच्या मृत्यूचे प्रमाण समोर आले आहे, अमेरिकेमध्ये हेच प्रमाण 1.78 आहे, तर भारतामध्ये ते 1.14 इतके कमी दिसून येते. दर दहा लाख लोकसंख्येमागे जिथे युरोपातील अनेक देशांमध्ये 2000 च्या वर लोक मेले आहेत, भारतात हा आकडा 130 इतका कमी आहे. भारतामध्ये जगाच्या तुलनेने मृत्यूदर कमी असल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले जात आहे. भारतातील नागरिकांची प्रतिकारशक्ती जास्त आहे असेही तर्क काही जण देत आहेत, आणि तसे असेल तर नक्कीच चांगली बाब ठरेल, परंतु **भारतातील मृत्यूचे प्रमाण कमी दिसण्याचे एक मोठे कारण केंद्र आणि विविध राज्य सरकारांमार्फत आकडे लपवणे आहे**! काही उदाहरणे पाहूयात.

**गुजरातची** स्थिती पाहूयात. **गुजरातचे रंगवले गेलेले चित्र काय आहे?** बडोदा महानगरपालिकेने प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार बडोद्यामध्ये दिवसाला 3 पेक्षा कमी लोक मृत्यू पावत आहेत. सुरतमध्ये हाच आकडा 20 आहे,तर राजकोट मध्ये 15. पण बडोद्याच्या सर्वात मोठ्या एस.एस.जी. या एकाच रूग्णालयात एप्रिल मध्ये आठवड्यात 142 मृत्यू झाले आहेत. बडोद्यातच जी.एम्.सी.आर. रुग्णालयात 7 दिवसात 90 वर मृत्यू झाले आहेत. एकंदरीत 300 पेक्षा जास्त लोक तर एका आठवड्यात बडोद्यातच मृत्यू पावल्याचे आकडे आहेत. 12 एप्रिल रोजी 30 मृत्यूंची माहिती असताना महानगरपालिका मृत्यूचा आकडा फक्त 3 सांगत आहे. **बडोदा महानगरपालिका खोटे बोलत आहे** हे स्पष्ट आहे. अहमदाबाद मध्ये 13 एप्रिल रोजी 23 मृत्यूंची नोंद आहे, पण स्मशानात 80 ते 90 चिता कोव्हिड-बंधनांसहीत जाळल्या गेल्या. गुजरातमधील राजकोट शहरामध्ये 23 एप्रिल रोजी अनेक महिन्यांमध्ये झालेल्या एकूण मृत्यूंचा आकडा 148 होता, त्याच दिवशी संदेश या वर्तमानपत्रामध्ये एकाच दिवशी 285 शोक संदेश प्रसिद्ध झाले होते. हे लक्षात घ्या की वर्तमानपत्रांमध्ये शोक संदेश फक्त मध्यमवर्गीय-पैसेवाले लोकच प्रसिद्ध करू शकतात, म्हणजेच गरिब, कामगारवर्गीय मृत्यू मोजले तर 285 पेक्षा जास्त लोक मृत्यू पावले होते, पण सरकारी आकडा नगण्य होता. राजकोट मध्ये रोज सरासरी 170 पेक्षा मृत्यू होत असल्याचा अंदाज आहे. सुरत मध्ये सतत जळत असलेल्या चितांमुळे तर स्मशानभुमीतील भट्ट्यांची काच वितळली! तिथे रोज जवळपास 100 चिता जाळल्या जात आहेत आणि जाळण्यासाठी 8 ते 10 तास वाट बघावी लागत आहे. **स्मशानभूमीच्या कर्मचाऱ्यांना मृत्यूचे कारण ‘आजारामुळे’ एवढेच लिहायला सांगितले जात आहे.**

उत्तरप्रदेशातील कानपूर शहरामध्ये 22 एप्रिल रोजी एकाच दिवशी 476 चिता जाळल्या गेल्या, आणि दिवस-रात्र स्मशानभूमीतून धूर निघतच होता, पण सरकारी आकड्यांनुसार त्या दिवशी फक्त 3 लोकांचा कोरोनाने मृत्यू झाला होता. 16 एप्रिल रोजी आग्रा, गाझियाबाद आणि झाशीमध्ये शून्य मृत्यूंची नोंद केली गेली. 15 एप्रिल रोजी 75 पैकी 46 जिल्ह्यांमध्ये एकाही मृत्यूची नोंद झालेली नाही. म्हणायला 16 एप्रिल रोजी राज्यभरात फक्त 103 मृत्यू झाले. गाझियाबाद मध्ये एप्रिल महिन्यात मिळून फक्त 4 मृत्यू

पान 4 वर

# ऑटोनियम कंपनीच्या कामगारांचा संघर्ष आणि वाढते आव्हान

- बिगुल पत्रकार

बहरोड (जिल्हा निमराणा, राजस्थान) येथील ऑटोनियम कंपनीच्या कामगारांचा कामावरून काढणे, सक्तीने बदल्या, खोटे खटले आणि धमक्यांचा विरोधात संघर्ष 2019 सालापासून चालू आहे. यावेळी मार्च च्या सुरुवातीलाच कंपनीच्या परमनंट युनियनचे उपाध्यक्ष योगिंदर यादव यांनी कंपनीच्या गेट वर स्वत:वर पेट्रोल ओतले, पेट्रोल पिले आणि बेशुद्ध झाले. त्यांना आणीबाणीच्या स्थितीत आय.सी.यु. मध्ये भरती करावे लागले. योगिंदर यादव यामुळे त्रस्त होते की कंपनीद्वारे सतत युनियन तोडण्याचे आणि मागण्या ना मानता अनावश्यक बदल्यांचे सत्र चालू होते.

ही युनियन सिटू अंतर्गत येते. युनियनचे 32 सदस्य कंपनी परिसरातच हत्यार खाली टाकून संपावर बसले होते. परंतु पोलिसांनी त्यांना धमकावले, दोन मजुरांना ताब्यात घेतले आणि धमकी दिली कि सर्वांना तुरुंगात टाकले जाईल. मजुरांनी कंपनी आवार सोडले आणि ते बाहेर येऊन बसले. यानंतर कंपनीने चार कामगारांना कामावरून काढून टाकले आणि 9 जणांना निलंबित केले. यानंतर 18 जण कामावर हजर झाले. अशाप्रकारे कंपनीने कामगारांचे आंदोलन मोडून काढले. यानंतर कंपनी गेटवर चालू असलेले आंदोलनही मोडीत काढले गेले.

या अगोदर गेट चालू असलेल्या आंदोलनाला डायकिन आणि रुचीस बियर, टी जी मिंडा या कंपन्यांमधून काढून टाकलेल्या काही कामगारांनी आणि कामगार नेत्यांनी पाठींबा दिला होता. परंतु ते सुद्धा कामगारांच्या इतका थांबवू शकले नाहीत. ऑटोनियम एकता कामगार युनियन द्वारे कामगार आयुक्त, पोलीस इत्यादींना निवेदन तर दिले गेले आहे परंतु कामगार कार्यालयाने फक्त दिखावाच केला आहे आणि कामगारांना खोटी आश्वासने दिलीत पण कंपनीवर कोणतीही कारवाई केलेली नाही.

इतिहासात थोडे मागे वळून पाहिले तर दिसेल की 2019 मध्ये कंपनीने 33 ठेकेदारी कामगारांना कामावरून काढले होते. परंतु त्यावेळी कायम कामगारांनी त्यांच्या समर्थनात टूल डाऊन (हत्यार खाली ठेवून) आंदोलन न केल्याची सल ठेकेदारी कामगार बाळगून आहेत. युनियन ने त्यावेळी फक्त तक्रार नोंदवण्याचे काम केले. कारखान्यात असलेल्या बी.एम.एस. च्या दुसऱ्या युनियनने सुद्धा ठेकेदारी कामगारांचे समर्थन केले नव्हते. परिणाम आहे कि आता 100 च्या आसपास संख्येने असलेले ठेकेदारी कामगार युनियन पासून दूर झाले आहेत. कामगारांमध्ये असलेल्या या फुटीचा फायदा कंपनीला नक्कीच होत आहे.

या अनुभवातून आपण शिकले पाहिजे कि कंपनीच्या स्तरावर कायम आणि ठेकेदारी/तापुरत्या कामगारांमध्ये एकता तर आवश्यक आहेच, परंतु एक मालक नाही, तर संपूर्ण मालक वर्गाविरोधात शक्ती संघटित करण्यासाठी उद्योगाच्या स्तरावर कामगारांनी एका युनियन मध्ये संघटित होणे आवश्यक झाले आहे. सिटू सारख्या केंद्रीय युनियन आता फक्त पगार, बोनस भत्ते यापुरत्याच मर्यादित राहिल्या आहेत. खऱ्या अर्थाने कामगार वर्गीय राजकारणांशी जोडलेल्या युनियन बनवणे आपली गरज बनली आहे.



**कामगार वर्गाचे महान शिक्षक**
**लेनिन (22 एप्रिल 1870-21 जानेवारी 1924)**
**यांच्या जन्मदिना निमित्त त्यांची काही उद्धरणे**

क्रान्तिकारी सिध्दांताशिवाय कोणतीही क्रान्ति होऊ शकत नाही

एक वर्तमानपत्र फक्त सामूहिक प्रचारक आणि उद्वेलक नसते, तर एक सामूहिक संघटक सुद्धा असते.

सर्व आधिकारीक आणि उदारवादी विज्ञान मजुरी-गुलामीचे समर्थन करते, जेव्हा की मार्क्सवादाने त्या गुलामीविरोधात अविरत युद्ध पुकारले आहे.

**बिगुल व्हॉट्सअॅप चॅनेल**

**जर तुम्ही आमच्याशी व्हाट्सअॅप वर जोडून घेऊ इच्छिता, तर या लिंक वर जाऊन आमचा व्हॉट्सअॅप चॅनेल जॉईन करावा - http://www.marathi.mazdoorbigul.net/whatsapp**

**चॅनेल जॉईन करण्यामध्ये काही समस्या असेल तर या नंबर वर आपले नाव आणि जिल्हा लिहून पाठवावा - 9892808704 (पर्यायी नंबर 9619039793)**



**बुर्झ्वा वृत्तपत्रे भांडवलाच्या विशाल ढिगांच्या बळावर चालतात, कामगारांची वृत्तपत्रे स्वतः कामगारांनी गोळा केलेल्या पैशावर चालतात.**
**लेनिन**

साथींनो

'कामगार बिगुल' आपले स्वतःचे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र अधिक चांगले बनवण्यासाठी आपल्या सूचनांचे आम्ही स्वागत करतो. त्याच बरोबर आपण जर देशभरातील कामगारांपर्यंत आपल्या कारखान्यातील, ऑफिस मधील परिस्थिती, मालक वर्गाकडून केली जाणारी लूट, संसदीय राजकीय पक्षांचा श्रीमंत धार्जिणेपणा, पोलिस व मालकांच्या खाजगी गुंडांकडून केले जाणारे अत्याचार, तुमच्या रहिवासी वस्त्यांमधील खराब परिस्थिती, शिक्षण, आरोग्य यांसारख्या सुविधांचा अभाव इत्यादी विषयी आपली मतं पोहचवू इच्छित असाल तर आम्हाला आपले लेख किंवा प्रतिक्रिया पाठवू शकता. आपण आम्हाला खालील पत्त्यावर पत्र पाठवू शकता किंवा फोन करून सुद्धा संपर्क साधू शकता.


• रूम नंबर 209, हिरानंदानी बिल्डिंग-7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043 मो. - 9619039793, 9082861727
• अहमदनगर - 9156323976, 9657590491
• पुणे - 9422308125


## 'कामगार बिगुल'चे स्वरूप, उद्देश आणि जबाबदाऱ्या

**1. 'कामगार बिगुल' व्यापक कष्टकरी जनतेमध्ये क्रांतिकारी राजकीय शिक्षक व प्रचारकाची भूमिका पार पाडेल. हे वृत्तपत्र कामगारांमध्ये क्रांतिकारी वैज्ञानिक विचारधारेचा प्रचार करेल आणि खऱ्याखुऱ्या सर्वहारा संस्कृतीचा वाहक बनेल. हे वृत्तपत्र जगभरातील क्रांतींचा इतिहास आणि त्यांच्यातून घ्यावयाचे शिक्षण, आपल्या देशातील वर्ग संघर्ष, कामगार चळवळीचा इतिहास आणि त्यातून घ्यावयाचे धडे यांच्याशी कामगार वर्गाला परिचित करेल. त्याच बरोबर समस्त भांडवली अफवा-दुष्प्रचारांचा भांडाफोड करेल.**

**2. 'कामगार बिगुल' भारतीय क्रांतीचे स्वरूप, मार्ग आणि समस्यांविषयी क्रांतिकारी कम्युनिस्टांमध्ये चालणाऱ्या विविध चर्चा नियमित रुपात छापेल आणि देश-विदेशातील राजकीय घटना आणि आर्थिक परिस्थितीचे योग्य विश्लेषण मांडून कामगार वर्गाला शिक्षित करण्याचे काम करेल.**

**3. 'कामगार बिगुल' स्वतः अश्या चर्चा चालवेल जेणे करून कामगारांचे राजकीय शिक्षण होईल. तसेच त्यांच्यामध्ये योग्य लाइनची समज विकसित होऊन ते क्रांतिकारी पार्टी बनवण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकतील आणि त्यातून व्यवहारामध्ये योग्य लाइनच्या सत्यापनाचा आधार तयार होऊ शकेल.**

**4. 'कामगार बिगुल' कामगार वर्गामध्ये राजकीय प्रचार आणि शिक्षणाचे कार्य चालवत सर्वहारा क्रांतीच्या ऐतिहासिक जबाबदारीशी त्याला परिचित करेल, त्याला आर्थिक संघर्षांसोबतच त्याच्या राजकीय अधिकारांसाठी लढायला शिकवेल, चार आणे-आठ आण्याच्या किरकोळ आर्थिक लढायांमध्ये कामगारांना अडकावून टाकणाऱ्या नकली कम्युनिस्टांपासून आणि भांडवली राजकीय पक्षांचे शेपूट असलेल्या किंवा व्यक्तिवादी-अराजकतावादी ट्रेड युनियन्स पासून सावध करत त्याला हरतऱ्हेच्या अर्थवाद व सुधारवादाविरुद्ध लढायला शिकवेल, त्याच बरोबर त्याच्यात सच्ची क्रांतिकारी चेतना निर्माण करेल. 'कामगार बिगुल' सर्वहारा वर्गाच्या फळ्यांमधून क्रांतीकारकांची भरती करण्याच्या कामात सहाय्यक बनेल.**

**5. 'कामगार बिगुल' हे वृत्तपत्र कामगार वर्गाचा क्रांतिकारी शिक्षक, प्रचारक आणि आवाहनकर्ता ह्या भूमिकांबरोबरच क्रांतिकारी संघटनकर्ता व आंदोलनकर्त्याची भूमिका सुद्धा पार पाडेल.**


# कामगार बिगुल

खाजगी वितरणासाठी

| | | |
|---|---|---|
| संपादक मंडळ | : | निखील एकडे, बबन ठोके |
| संपादकीय कार्यालय : | | रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग - 7-बी, लल्लुभाई कम्पाउण्ड, मानखुर्द (वेस्ट), मुंबई 400043 |
| संपर्क | : | 8669735643 , 9619039793 |
| ईमेल | : | bigulakhbar@gmail.com |
| सहयोग राशी | : | रु. 5 (एका अंकासाठी) |
| वार्षिक | : | रु. 100 (टपाल शुल्कासह) |

# शिकण्याचं कोणतंही वय नसतं!

## पितृसत्ताक गुलामीला झुगारत, जुलमी व्यवस्थेविरोधात, शिक्षणाला आपलं हत्यार बनवण्याचा निर्धार करत आहेत द्वारका ताई आणि अनेक स्त्रिया!

✍ सुरज

कामगार-कष्टकरी वर्गातून येणाऱ्या अनेकांना लिहिता वाचता येत नाही. विशेषत: कोट्यवधी स्त्रिया साक्षर नाहीत. तरीही अनेक जण 'आता माझे वय झाले, आता शिकून काय होणार' अशी भाषा करत शिकण्याचा कंटाळा किंवा टाळंटाळ करतात. पुण्यामध्ये स्त्री-मुक्ती लीग तर्फे पौढ महिला शिक्षण वर्ग चालवला जात आहे, ज्यामध्ये अनेक कामगार महिला वयाचे बंधन झुगारून शिकत आहेत. **यापैकीच एक आहेत द्वारका सोनवणे. वयाची साठावी पूर्ण झाली तरी शिकण्याची इच्छा अजूनही संपलेली नाही.** सोलापूर जिल्ह्यामधील बार्शी तालुक्यातील रऊळ हे त्यांचं गाव. पाच भावंडं- चार बहिणी, एक भाऊ आणि आई-वडील असं त्यांचं कुटूंब. आई वडील दुसऱ्याच्या शेतात मजूरीने काम करायचे. पण त्यांना कामाची कधीही शाश्वती नसायची. कधी काम भेटायचं तर कधी नाही. द्वारका ताईंनी तिसरी पर्यंत शिक्षण घेतलं. शिकण्याची खूप तळमळ व आवड. पण परिस्थिती अत्यंत बिकट असल्या कारणामुळे द्वारका ताईंना शाळेत जाताना बऱ्याच अडचणींना सामोरे जावं लागायचं. जसं की त्यांना अंगावर घालायला होता फक्त एक फ्रॉक. शाळेत जाताना एक नदी लागे. त्याच नदी काठी सकाळी अंघोळ करायची, आणि ओलेत्यानंच शाळेत जायचं. अशातच सुनामी जशी येते तसा बहात्तर चा दुष्काळ हा तोंडातला घास घेऊन गेला. परिस्थिती अत्यंत बिकट झाली. मजुरी भेटेना झाली. एकेका भाकरीच्या तुकड्यासाठी वणवण फिरावं लागू लागलं. घरात खायला काही नसल्यामुळे घराच्या छताचे पत्रे विकावे लागले आणि त्याजागी आसरा म्हणून पालापाचोळा टाकावा लागला. या सगळ्या धकाधकीमध्ये द्वारका ताईंना तिसरीच्या अर्ध्यातूनच शाळा सोडावी लागली.

गावाकडे मजुरी भेटत नसल्या कारणामुळे व अर्धपोटी उपाशी राहावं लागत असल्यामुळे पुण्याकडे येऊन काहीतरी काम भेटेल व रोजी रोटीचा प्रश्न सुटेल ह्या आशेवर शहराकडे येण्याचा निर्णय घेतला. पुण्यात आल्यानंतर वयाच्या 10 व्या वर्षांपासूनच आई-वडिलांसमवेत चार ते पाच वर्ष बिगारी काम केलं. आईला अडीच रुपये तर वडिलांना चार रुपये अशी मजुरी भेटत होती. तेवढ्या मजुरीवर कसं तरी घर चालायचं. अशातच अवघ्या वय वर्ष चौदा ते पंधरा असतानाच द्वारका ताईंना संसाराचा गाडा ओढवा लागला. घर चालवण्यासाठी लागणाऱ्या वस्तू म्हणजेच भांडीकुंडी एकही जवळ नव्हती. काच-पत्रा भंगाराच व बिगारी काम करून आठवड्यातून एक एक वस्तू जमा करत संसाराचा पाया उभा केला. काही वर्ष ही चिमणीच्या प्रकाशाखालीच सरली. पुण्यात असतानाच काही वर्ष द्वारका ताईंनी उसतोडीच पण काम केलं. द्वारका ताईंना तीन मुली व एक मुलगा. चौघांची पण लग्न झाली. मुला-मुलींना व नातू-नातींनी खूप काही शिकावं, स्वतःच्या पायावर उभा राहून मोठं काहीतरी बनावं, समाजासाठी काहीतरी करावं अशी द्वारका ताईंची नातलगांकडून अपेक्षा! त्यांच्यासाठी त्या दिवसरात्र धडपडतात.



द्वारका ताई म्हणतात "मी माझ्या परिस्थिती मुळे शिकू शकले नाही पण मी माझ्या नातलगांना शिकवणार. बाहेरची शिकवणी परवडत नाही तरी मी स्वतः शिकून नातू नातीला शिकवणार. स्त्री मुक्ती लीग तर्फे सुरू करण्यात आलेल्या प्रौढ महिला शिक्षण वर्गाला मी नियमित जाते. प्रौढ महिला शिक्षण वर्गामध्ये मला खूप काही शिकायला भेटतं व ते मी जिद्दीनं शिकत आहे. आम्ही महिलांवर होणारे अत्याचार, समाजात महिलांना दिल जाणारं दुय्यम स्थान, देशभरातील घडामोडी, कविता व विविध मुद्यांवर असलेले लेख हे वाचतो व त्यावर एकत्रित चर्चा करतो. यातून आम्हाला बऱ्याच काही गोष्टी समजून येतात. मला अजून शिकण्याची इच्छा आहे." द्वारका ताई वर्गाला तर जातातच पण त्या वस्तीतील इतर महिलांना पण शिक्षण वर्गासाठी प्रोत्साहित करतात. त्यांच्याच घरातील उदाहरण म्हणजे त्यांची सून सरिता सोनवणे या दोघी मिळून शिक्षण वर्गासाठी जातात. आणि त्यांची बारा वर्षांची नात कार्तिकी ही तर चक्क महिलांना शिकवते सुद्धा.

स्वत:च्या, इतरांच्या आणि समाजाच्या शिक्षणासाठी सुद्धा धडपड करणाऱ्या द्वारका ताईंनी सत्तेत आलेल्या प्रत्येक सरकारबद्दल सडेतोड मत मांडले की "सरकारने गरिबांचे खूप हाल केले. कोणतंच सरकार हे गरिबांच्या बाजूचे नाही. मतदान आलं की मत देई पर्यंत आपलं म्हणवतात, मोठी मोठी आश्वासन देतात, पाया पडतात. निवडून आल्यानंतर पाच वर्ष तोंड पण दाखवत नाहीत. साधी ओळख पण देत नाहीत. ज्यांनी आपल्याला मत दिलं ती माणसं मेली काय आणि जिवंत काय याच कसलंही त्यांना घेणं देणं नसतं."

वयाच्या साठाव्या वर्षी सुद्धा द्वारका ताई शिकण्याची जिद्द, मेहनतीची तयारी ठेवून आहेत! तेव्हा शिकायला वयाचं बंधन नसतं. असतात ती फक्त आपल्या डोक्यातली जुनाट बंधनं, आपल्याला मागे खेचणाऱ्या सामाजिक बंधनांची जाळी, जी आपण ओरबाडून फेकून द्यायला हवीत आणि सर्व कामगार-कष्टकऱ्यांनी शिक्षणाची कास धरायला हवी.

यानिमित्ताने कामगार वर्गासाठी कलेचा हत्यार म्हणून वापर करणारे शहीद सफदर हाशमी यांची कविता आठवते

पढ़ना-लिखना सीखो ओ मेहनत करने वालो
पढ़ना-लिखना सीखो ओ भूख से मरने वालो
क ख ग घ को पहचानो
अलिफ़ को पढ़ना सीखो
अ आ इ ई को हथियार
बनाकर लड़ना सीखो!

# घरकामगार संघर्ष समितीतर्फे, पुण्यात 8 मार्च महिला दिनानिमित्त अभिवादन फेरी

**- बिगुल पत्रकार**

8 मार्च, आंतरराष्ट्रीय महिला कामगार दिवस हा स्त्रियांच्या अधिकारांसाठीच्या, स्त्री-पुरुष समानतेसाठीच्या लढ्याची आठवण काढण्याचा, आणि त्याच्या समर्थनात एकजूट होण्याचा दिवस आहे.

भारतात हजारो वर्षे स्त्री ही रूढी, परंपरा, पितृसत्ता अशा अनेक गुलामींना बळी पडत आली. चूल आणि मुलाच्या चौकटीबाहेर स्त्रीने पडू नये, लहानपणीच बालविवाह, नवरा मेल्यावर केशवपन व सती जाण्याची प्रथा, शिक्षणाचा हक्क नाही या बंधनांमध्येच आयुष्य फिरत राही. जगाच्या स्तरावरही स्त्रियांची स्थिती काही वेगळी नव्हती. परंतु युरोपातील भांडवलशाही सोबतच जन्माला आलेल्या महिला कामगार वर्गाने स्त्री अधिकारांसाठीच्या आणि स्त्री-मुक्तीसाठीच्या लढ्यांना जन्म दिला. क्लारा झेटकीन सारख्या लढवय्या कम्युनिस्ट महिला कार्यकर्त्यांच्या नेतृत्वाखाली हजारो महिला कामगार संघटित होऊन रस्त्यांवर उतरल्या. एक कामगार म्हणून स्वतंत्र अस्तित्व, कामाचे तास कमी करून मिळावे, पुरुष कामगारांच्या बरोबरीने समान कामाला समान वेतन, मतदानाचा अधिकार अशा अनेक मागण्या घेऊन महिला रस्त्यावर उतरल्या व कुठल्याही सत्तेच्या दमनाला, बळाला न जुमानता संघर्ष चालू ठेवून आपल्या मागण्या त्यांनी दीर्घ लढ्यानंतर पूर्ण करवून घेतल्या. महिला कामगारांच्या लढ्यातून प्रेरणा घेऊन सुरू झालेल्या, आंतरराष्ट्रीय समाजवादी महिला कामगार आंदोलनाने शंभर वर्षांपूर्वी पुरस्कार केलेल्या, आणि रशियातील कामगार वर्गीय क्रांतीने स्थापित केलेल्या 8 मार्च आंतरराष्ट्रीय महिला कामगार दिनाची रुजवात कामगार वर्गीय आहे.



ह्याच लढ्यांपासून प्रेरणा घेत 8 मार्च रोजी आपल्या मागण्या घेऊन, आजही विविध प्रकारच्या गुलामीत दबलेल्या स्त्रिया स्त्रीमुक्तीच्या लढ्याला पुढे नेण्यासाठी दरवर्षी रस्त्यावर उतरतात. **पुण्यातही घरकामगार संघर्ष समितीतर्फे 8 मार्च रोजी स्त्रीमुक्तीच्या लढ्यातील कार्यकर्त्यांना अभिवादन करत, स्त्रीमुक्तीचा निर्धार व्यक्त करत अभिवादन-फेरी आयोजित केली गेली.**

फेरीची सुरुवात क्रांतिकारी घोषणांनी झाली. **"आंतरराष्ट्रीय महिला कामगार दिवस चिरायू होवो.", "मार्ग मुक्तीचा बनवावा लागेल, जगायचे असेल तर लढावे लागेल." अशा अनेक घोषणांनी अप्पर इंदिरानगरचा परिसर दणाणून गेला.** एक दिवस कामावर गेलो नाहीत तर खाडे पडतील याची जाण असूनही महिलांनी घोषणा देत, हातात मुक्तीचा संदेश देणाऱ्या दफ्त्या घेत, झेंडे घेत शारीरिक अंतराचे नियम पाळत फेरीला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सावित्रीबाई फुले, फातिमाबी शेख सारख्या

पान 10 वर

# फास्टॅग : जनतेवर पाळत ठेवण्याचे नवे हत्यार

✍ - रवी

जगातील सर्वच भांडवली सरकारे दिवसेंदिवस जनतेच्या मूलभूत लोकशाही-नागरी अधिकारांवर गदा आणण्याचे काम करत आहेत. फॅसिस्ट मोदी सरकार तर या स्पर्धेत फार पुढे आहे. वेळोवेळी कायद्यांमध्ये बदल करून, नवीन शासन निर्णय लागू करून जनतेच्या खाजगी माहितीची गोपनीयता धाब्यावर बसवण्याच्या बातम्या तुम्ही बऱ्याच वेळा ऐकल्या असतील. 2018 चा माहिती तंत्रज्ञान कायद्यात बदल करणारा शासन निर्णय असो किंवा 2019 चे खासगी डेटा सुरक्षा विधेयक असो, जनतेवर आणि विशेषत: राजकीय कार्यकर्त्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी फॅसिस्ट कोणत्याही थराला जाऊ शकतात हे नक्की. आधार कार्ड, ज्याच्याशी आज प्रत्येक आर्थिक व्यवहार जोडला गेला आहे, त्याचा वापर मुख्यत्वे जनतेवर पाळत ठेवण्यासाठीच होतो यात शंका नाही. नुकतेच 'वाहनाचे आधार कार्ड' म्हणून प्रसिद्ध करण्यात आलेल्या फास्टॅग ची तीच गत आहे. चला, सरकारच्या जनतेवर पाळत ठेवण्याच्या या नव्या हत्याराचे वास्तव जाणूयात.

2016 मध्ये पहिल्यांदा फास्टॅग नावाची संकल्पना राष्ट्रीय महामार्गांसाठी अस्तित्वात आणली गेली. वाहन चालकांनी फास्टॅग नावाचे एक कार्ड घेऊन त्यावर वाहनाची माहिती वापरून नोंदणी करायची आहे. ते कार्ड वाहनाच्या पुढच्या काचेला लावायचे. त्यानंतर फास्टॅग खात्यामध्ये पैसे जमा करायचे. जेव्हा फास्टॅग लावलेले वाहन राष्ट्रीय महामार्गावरील टोल नाक्यावर येईल तेव्हा फास्टॅग यंत्र स्कॅन होईल आणि स्वयंचलित पद्धतीने त्यातून टोलची रक्कम वजा होईल. अशा पद्धतीने नाक्यांवर टोल भरण्यासाठीचा वेळ शून्य केल्याने रहदारी ठप्प होण्यावर आळा बसेल ज्यामुळे इंधन आणि वेळेची बचत होईल, तसेच काळे व्यवहार करणाऱ्या नाक्यांवर वचक बसेल, **असा सरकारचा दावा आहे.**

मागच्या फेब्रुवारी महिन्यापासून केंद्र सरकारने सर्व राष्ट्रीय महामार्गावर फास्टॅग अनिवार्य केले आहे. जर फास्टॅग नसेल तर दुप्पट टोल भरावा लागणार आहे. प्रश्न आहे की दुप्पट टोल का? आणि दुप्पट टोल कोणाला द्यायचा असेल तरीही सरकारची फास्टॅगची सक्ती का?

फास्टॅग देण्यासाठी देशातील 22 बँकांना पात्र ठरवण्यात आले आहे. 'कॅशलेस' अर्थव्यवस्थेकडे उचलले गेलेले पाऊल असा सरकार या तंत्रज्ञानाचा प्रचार करत आहे. परंतु दररोज होणारे हे लाखो कॅशलेस व्यवहार सांभाळण्यासाठी फास्टॅग धारकाची बँक, टोल नाक्याचे खाते असलेली बँक आणि काही सरकारी संस्थांना टोलच्या रकमेतून 4% रक्कम द्यावी लागत आहे. आणि ही रक्कम वाहनधारकाला मोजावी लागत आहे यात आश्चर्यकारक असे काहीच नाही. म्हणजेच फास्टॅगचा वापर केल्यास 4% अधिक रक्कम खात्यातून वजा होत आहे. असो, ही बाब छोटी वाटावी असा पुढचा भयंकर मामला फास्टॅगशी जोडलेला आहे.

जर सरकारला खरंच कॅशलेस व्यवहार करण्यावरच भर द्यायचा होता तर **कारधारकांची खाजगी माहिती आणि बँक खात्यांची माहिती वाहनाशी का बरे जोडली जात आहे?** देशात अशा पद्धती उपलब्ध आहेत जेथे कॅशलेस आर्थिक व्यवहार निनावी पद्धतीने होतात, कोणतीही खाजगी माहिती न घेता (उदा. मेट्रो कार्ड). तंत्रज्ञानाचा उपयोग मानवी श्रम कमी करण्यासाठी होऊ शकतो, पण तेव्हाच जेव्हा तंत्रज्ञानावर जनतेची सामूहिक मालकी असते. फास्टॅगने टोल नाक्यावर लागणारा वेळ नक्कीच कमी होईल परंतु कोणती किंमत मोजून?

फास्टॅगचे मूलभूत ध्येय भारताच्या राष्ट्रीय महामार्गांवर होणाऱ्या हालचालींच्या माहितीला एका छताखाली आणणे हेच आहे. अगोदर सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांद्वारे आणि स्वयंचलित वाहन क्रमांक वाचकाद्वारे माहिती गोळा होतच होती. परंतु आता या माहितीचे संकलन अत्यंत सोपे झाले आहे. शिवाय या माहितीवर केंद्र सरकारचे नियंत्रण असेल. जेव्हा सर्व वाहनधारकांची माहिती एका तक्त्यामध्ये असेल, तेव्हा व्यक्तींच्या स्वातंत्र्याचे मार्ग नक्कीच कमी होतात; याउलट सरकारला स्वातंत्र्यावर बंधन आणण्याचे अनेक मार्ग मोकळे होतात. फक्त तुमच्या हालचालींची माहिती नाही तर तुमच्या हालचालींवर नियंत्रण ठेवणे सुद्धा या तंत्रज्ञानातून करता येईल यात काही वाद नाही. **एखाद्या वाहनाला ब्लॉक करण्याचे ठरवले तर सरकार चुटकीसरशी ते करू शकते** आणि एखाद्या वाहनाला राष्ट्रीय महामार्गांवरून फिरण्यास प्रतिबंध करू शकते.

**फास्टॅग व्यवहारांमधून तयार होणारी माहिती फक्त सरकार दरबारीच नाही तर ही सेवा पुरवणाऱ्या बँकांकडेही जमा होत आहे.** राष्ट्रीय स्तरावर जमा होणाऱ्या या माहितीचा आकार अवाढव्य असेल. महितीला विकून हे धंदाशेठ हजारो कोटी रुपये कमावतील. हीच माहिती पुन्हा आपल्यावरच जाहिरातींचा भडिमार करण्यासाठी किंवा आपल्याला एका ठराविक विचारचक्रामध्ये अडकवण्यासाठी किंवा आपले राजकीय मतपरिवर्तन करण्यासाठी भांडवलदार वापरत असतात, हे आता जगजाहीर आहे.

भांडवलशाहीमध्ये लोकशाही हा फक्त एक मुखवटा असतो ज्याला ही व्यवस्था कधीही काढून फेकू शकते. भांडवलशाहीमध्ये सत्ता ही मूठभर मालकांच्या हातात असल्याने ती टिकवण्यासाठी संपूर्ण जनतेवर आणि विशेषतः राजकीय कार्यकर्त्यांवर पाळत ठेवणे हे महत्वाचे काम बनते. आज देशामध्ये जनतेला एकजूट करणाऱ्या आणि अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या कार्यकर्त्यांवर खोटे खटले चालवले जात आहेत. यासाठी बनावट पुराव्यांचा सर्रास वापर पोलीस करत आहेत. विचार करा, जर देशातील सर्व नागरिकांची सर्व माहिती एका छताखाली असेल तर बनावट पुरावे बनवणे हे सरकारच्या हातचा मळ होईल.

**देशाचे परिवहन मंत्री गडकरी लोकसभेत बोलताना म्हणाले,** "93% वाहनधारक फास्टॅगचा वापर करून टोल भरतात, परंतु उर्वरित वाहनधारक दुप्पट टोल भरावा लागत असूनही फास्टॅग वापरत नाहीत. **यावरून असे वाटते की त्यांना आपल्या हालचालींच्या नोंदी होऊ द्यायच्या नाहीत. आता त्यांच्या पोलिस चौकशीचे आदेश मी दिले आहेत." हे स्पष्ट आहे की मोदी सरकारचा खरा इरादा टोल नाक्यांवर गर्दी कमी करणे नाहीये तर नागरिकांवर पाळत ठेवणे हा आहे.**

हे षडयंत्र इथेच थांबलेले नाही तर आता वाहनांना जागतिक स्थिती प्रणाली (ग्लोबल पोजिशनिंग सिस्टम, जीपीएस) यंत्र लावणे अनिवार्य करण्याचा निर्णय शासन लवकरच लागू करणार आहे, ज्यामुळे कोणते वाहन कुठे आहे हे कोणत्याही वेळी एका बटणावर कळू शकेल. जेव्हा एखादा कायदा एवढ्या सक्तीने लागू केला जातो तेव्हा भांडवली राज्यसत्ता आणि अंतिमतः ही भांडवली चौकट अजून बळकट करण्यासाठी त्याचे प्रयोजन केलेले असते. आज देशात प्रत्येक ठिकाणी माहितीच्या आधारेच व्यवहार होत आहेत. जर या माहितीवर एका केंद्रीय सत्तेचे नियंत्रण असेल तर या सत्तेच्या विरोधात बोलणाऱ्या प्रत्येकाच्या नागरी अधिकारांना धोका आहे. निजतेच्या अधिकारांवर होणारे हे हल्ले जर वेळीच थांबवले गेले नाही तर या देशामध्ये श्वास घेण्यासाठीसुद्धा सत्ताधारी वर्गाची परवानगी घ्यावी लागेल.

# देशभरात लपवले जात आहेत कोरोना मृत्यूचे आकडे !

पान 1 वरून

झाल्याची नोंद आहे. परंतु गाझियाबादच्याच स्मशानभूमीतील कर्मचाऱ्यांच्या मते 50 तरी मृतदेह 16 एप्रिल रोजी जाळले गेले. बरेलीमध्ये 15 एप्रिल रोजी एका मृत्यूची नोंद आहे, परंतु दुसऱ्या लाटेमध्ये आता जवळपास 40 चिता रोज जळत आहेत. आग्र्याला 15 एप्रिल रोजी 3 मृत्यूंची नोंद आहे परंतु त्या दिवशी 48 चिता जाळल्या गेल्या आणि रोज किमान 30 चिता जाळल्या जात आहेत. झाशीमध्ये दैनंदिन चितांमध्ये 3 ते 4 पट वाढ झाली आहे. एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात राजधानी लखनौ मध्ये सरकारच्या मते 124 मृत्यू झाले, पण स्मशानात 400 चिता जाळल्या गेल्या. **लखनौ मध्ये धडाधड जळत असलेल्या चितांचे फोटो सोशल मीडीयावर आल्यानंतर भाजपच्या योगी सरकारने स्मशानभूमीलाच झाकण्यासाठी पत्रे लावले.** दिल्लीनजिक नोयडा मध्ये 2 दिवसात 12 मृत्यू झाल्याची नोंद आहे, पण स्मशानभुमीत 75 च्या वर कोव्हिड चिता जाळल्या गेल्या, ज्यात दिल्लीवरून येणारे मृतदेह पकडले तरी आकड्यातील फरक मोठाच आहे.

मध्यप्रदेशामध्ये सुद्धा भयंकरच लपवाछपवी चालू आहे. 12 एप्रिल रोजी भोपाळच्या एका स्मशानभुमीत 37 चिता जाळल्या गेल्या, पण भाजप सरकारच्या मते त्या दिवशी संपूर्ण राज्यभरात 37 मृत्यू झाले, याच पद्धतीने 8 एप्रिल रोजी 35 चिता जाळल्या गेल्या, पण राज्याचा आकडा होता 27, असे रोजच चालू आहे. 16 एप्रिल ते 20 एप्रिल दरम्यान स्मशानघाट, स्मशानभूमीतून मोजलेल्या मृत्यूंची संख्या भोपाळमध्ये 597 होती पण राज्य सरकारी आकडा 348च होता. 21 एप्रिल रोजी सरकारी आकडा भोपाळसाठी 5होता, पण याच दिवशी 137 चिता जाळल्या गेल्या.



राजस्थानामध्ये सुद्धा कोटा, भिलवाडा, उदयपूर, अजमेर येथे सरकारी आकड्यांच्या 3 ते 4 पट चिता जाळल्या गेल्याचे दिसून आले आहे. भीलवाड्यामध्ये तर हा आकडा 6 पट आहे. उदाहरणार्थ, कोट्यामध्ये 30 मृत्यूंची नोंद आहे तर स्मशानात कोव्हिड-19 नियमांतर्गत 145 चिता जाळल्या गेल्या.

दिल्लीमध्ये 20 एप्रिल पर्यंत नगरपालिकांकडे कोव्हिड-19 सुरू झाल्यापासून 15,161 मृत्यूंची नोंद होती तर राज्य सरकारकडे 12,638. थोडक्यात 2,500 मृत्यूंची नोंद कमी केली गेली आहे.

झारखंड राज्यामध्ये 20 मार्च ते 8 एप्रिल दरम्यान 63 मृत्यूंची नोंद आहे. पण फक्त रांचीच्या एकाच विद्युत स्मशानभूमीत या काळात 69 चिता जाळल्या गेल्या.

असे दिसून आले आहे की कोव्हिड संशयितांचे मृत्यू कोव्हिडमुळे मरण पावलेल्यांच्या यादीमध्ये न मोजण्याचे काम किमान महाराष्ट्र, गुजरात, तेलंगणा, तामिळनाडू, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, गुजरात, दिल्ली आणि पाँडीचेरी मध्ये नक्की चालू आहे.

या कमी आकड्यांमागे दोन कारणे दिसून येत आहेत. पहिले हे की जर रुग्ण इतर रोगाने मेला असेल, पण कोव्हिड-19 पॉझिटीव्ह असेल तर त्याची कोव्हिड मृत्यू म्हणून नोंद होत नाही. दुसरे हे की जर मृत्यूवेळी कोव्हिड रिपोर्ट आलेला नसेल तरी ही नोंद घेतली जात नाही. आय.सी.एम.आर. या संस्थेने दिलेल्या सुचनांनुसार नोंदी केल्या जात असल्याचा दावा सर्वच राज्य सरकारे करत आहेत. परंतु आकड्यांमधल्या प्रचंड तफावती मात्र वेगळेच सत्य सांगत आहेत.

भारतात, जिथे नोंदी ठेवण्याची संस्कृतीच मुळात नाही आणि दुसरीकडे सरकारे आकडे लपवतच चालली आहेत, कोव्हिडमुळे होणारे खरे मृत्यू किती याचा अंदाज येण्यास बराच काळ नक्की जावा लागेल आणि अप्रत्यक्ष आकड्यांच्या अभ्यासातूनच माहिती समोर येईल. एक अंदाज जो आत्ता केला जात आहे तो असा: सिरोप्रिव्हेलंस सर्वे (किती जणांमध्ये कोव्हिड-19 च्या ॲंटीबॉडी सापडल्या याचे सर्वेक्षण) द्वारे संसर्ग मृत्यू दर (Infection Fatality Rate) काढला जाऊ शकतो आणि मृत्यूंचा एक वेगळा अंदाज बांधता येतो. याद्वारे जे अंदाज केले जात आहेत त्यानुसार 0.15 टक्के ते 0.33 टक्के दरम्यान मृत्युदर मोजल्यास 5 ते 11 लाख लोक कोव्हिड-19 मुळे मृत्यू पावले असावेत.

एकाही माणसाचा मृत्यू ही गंभीर बाब आहे. इथे तर सरकार लाखो मृत्यूंचे आकडे लपवत आहे हे स्पष्ट आहे

# मोदी सरकारचे नवीन चार कामगार कायदे !
# कामगार वर्गावरच्या मोठ्या हल्ल्याची सुरूवात !

✍ निश्चय


सप्टेंबर 2020 मध्ये भाजपच्या केंद्र सरकारने प्रस्तावित केलेले नवीन चार कामगार कायदे संसदेने पारित केले. हे करत असताना 44 जुने कायदे रद्द केले गेले आहेत. सध्या तापुरती लांबणीवर पडलेली अंमलबजावणी 1 एप्रिल 2021 पासून सुरू होणे अपेक्षित होते. कामगारांच्या हिताचा पुळका असल्याचा दिखावा करत केंद्रातील भाजप सरकारने पारित केलेले हे कायदे वास्तवात कामगार विरोधी आहेत आणि कामगार वर्गावरच्या मोठ्या हल्ल्याची सुरुवात आहेत. या चार कायद्यांद्वारे, कामगार चळवळींनी अतुलनीय संघर्ष आणि त्यागातून मिळवलेले अनेक अधिकार आता काढून घेतले जात आहेत. देशातील 93 टक्के कामगार हे असंघटित, अनौपचारिक क्षेत्रात काम करतात. त्यापैकी बहुसंख्यांक कामगारांपर्यंत तर कामगार कायद्यांची पोहोच कधीच नव्हती. उरलेल्या 7 टक्के संघटित क्षेत्रातील कामगारांना या नव्या चार कायद्यांचा सर्वात मोठा फटका बसणार असला, तरी राज्यसत्तेने कामगारांच्या अधिकारांची औपचारिक मान्यता काढून घेण्याचे हे सुतोवाच सर्वच कामगार वर्गावरचा मोठा हल्ला आहे.

### काय आहेत हे चार कायदे आणि त्यातील प्रमुख कामगार विरोधी तरतुदी?

मजूरी; औद्योगिक संबंध; व्यावसायिक सुरक्षितता, आरोग्य व कार्यस्थिती; आणि सामाजिक संरक्षण अशा 4 श्रम संहिता (नियमावली) सादर करणारे हे 4 कायदे आहेत. या कायद्यांनी सध्या लागू असलेले 44 कायदे रद्द केले आहेत. संख्येने जास्त असलेल्या कायद्यांमध्ये सुसूत्रता आणणे हे कारण मोदी सरकार देत असले तरी **खरे कारण आहे मालकांना श्रमिकांच्या श्रमशक्तीच्या पिळवणुकीची वाढती खुली सूट देणे.** अगोदरच्या कायद्यांमध्ये असलेल्या अनेक तरतुदी तर वगळल्या गेल्या आहेतच, सोबतच या कायद्यांद्वारे कामगारांच्या वेतनात कपात, कामाचे तास वाढवणे, मनमानी शर्ती लादणे मालकांना शक्य होणार आहे. कसे ते बघूयात.

### मजुरीची संहिता (कोड ऑन वेजेस, Code on Wages)

या कायद्याने संपूर्ण देशाकरिता एकच किमान मजुरी जाहीर केली जाईल. आज अक्राळविक्राळ महागाई पहाता देशामध्ये कोठेही किमान रु. 25,000 प्रति महिनापेक्षा कमी उत्पन्न मध्ये जीवनाची एक किमान सुसह्य पातळीही शक्य नाही. कुटुंबाचे पोषण, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, सण-सणावार, मनोरंजन, म्हातारपणाच्या तरतुदी इत्यादी किमान गरजांच्या भोवती किमान वेतन आखले गेले पाहिजे. सर्वोच्च न्यायालयाच्या 1992 च्या एका निर्णयातही हेच म्हटले होते. परंतु एकीकडे यासंदर्भात नेमलेल्या एका समितीने तर पोषण सोडाच फक्त भूक भागवण्याच्या निकषाला 2700 कॅलरी वरून 2400 वर आणले आहे, आणि गरजेच्या मूलभूत वस्तुंच्या किमती सन 2012 च्या किमतीनुसार मोजल्या आहेत. यापुढे जाऊन या कायद्यावर चर्चा करताना केंद्र सरकारचे श्रम मंत्री संतोष गंगवार यांनी संसदेत सांगितले की मजुरी 178 रुपये प्रतिदिवस इतकी कमी ठरू शकते. थोडक्यात महिन्याला 4,628 रुपये इतकी मजुरी पुरेशी आहे हे मोदी सरकार नागडेपणाने सांगत आहे! म्हणायला एक वेगळी समिती बसवली जाईल जी किमान वेतन ठरवेल, आणि सातव्या वेतन आयोगानुसार सरकारी कर्मचाऱ्यांना 18,000 रुपये किमान वेतन आहे; पण मोदी सरकारने 4,628 रुपयांचा इरादा मात्र जाहीर केला आहे! इतकेच नाही तर किमान मजुरी आता कामगारांच्या गरजेनुसार न ठरता, कामाच्या वेळेनुसार (टाईम वर्क) आणि प्रमाणानुसार( पीस वर्क) वरून ठरेल. महागाई रोजच वाढते, पण किमान वेतनाचा दर दरवर्षी सुद्धा नाही तर दर पाच वर्षांनी सुधारले जावा असेही हा कायदा म्हणतो. विविध कारणांनी कामगारांच्या वेतनातून पैसे कपात करण्याचे अधिकार मालकांना दिले गेले आहेत, ज्यामुळे हातात येणारे वेतन अजूनच कमी होणार. स्त्री-पुरुषांना समान वेतन न देण्याची सूटही आता हा कायदा मालकांना देतो.




यापुढे जाऊन या कायद्यानुसार ओव्हरटाईमची कल्पना संपवली गेली आहे. 'पूरक काम' आणि 'अनिरंतर काम' अशा चकवा देणाऱ्या शब्दांचा वापर करून जास्त काम करवण्याची तर तरतूद आहे, पण त्यासाठी अतिरिक्त दराने मजुरीची कल्पना मात्र संपवली गेली आहे. तसेच कुशल, अर्धकुशल, अकुशल अशा कामगारांच्या श्रेण्यांनाही हटवले गेले आहे. यामुळे आता कुशल आणि अर्धकुशल कामगारांना अजून कमी मजुरीत राबवणे मालकांना शक्य होईल.

बोनस देण्याच्या तरतुदींना कंपन्यांच्या हिताकरिता अस्पष्ट बनवले गेले आहे. कंपनीचा आर्थिक ताळेबंद खुला करण्यास अधिकाऱ्यांना मनाई केली गेली आहे! म्हणजे आता कंपन्या नफा होतच नाही असे म्हणायला आणि बोनस नाकारायला मोकळ्या! नियम तोडल्यास मालकांवर कारवाई करण्याच्या तरतुदी ढिल्या केल्या गेल्या आहेत. फॅक्टरी इन्सपेक्टरच्या जागी आता फॅसिलिटेटर म्हणजेच मध्यस्थाला आणले गेले आहे. थोडक्यात मालकांना धाक दाखवणे दूरच, आता त्यांच्याच वतीने सरकार मध्यस्थी करणार!

### व्यावसायिक सुरक्षितता, आरोग्य व कार्यस्थिती संहिता (The Occupational Safety, Health and Working Conditions Code, 2020)

कामगारांच्या कामाची जागी पुरेशी सुरक्षितता असली पाहिजे आणि कामगारांच्या आरोग्याची काळजी केली गेली पाहिजे अशा दिसायला उदात्त उद्दिष्टाने हा कायदा प्रस्तावित असला, तरी यामध्ये कामगारांकरिता वास्तवात काहीच नाही! 10 पेक्षा जास्त कामगार असणाऱ्या कारखान्यांनाच हा लागू होईल. देशातील लहान कारखाने, वर्कशॉप्स, अनौपचारिक रित्या चालणारी कामे बघता **कामगारांची खूप मोठी संख्या या कायद्याच्या अखत्यारित येतच नाही.** विविध कारखान्यांमध्ये जे विविध वेगवेगळे धोके असतात, त्याबद्दल या कायद्यामध्ये उल्लेखच नाही. कारखाना अधिनियम 1948 मध्ये कामाच्या जागी रासायनिक आणि विषारी पदार्थांच्या मात्रेवर जे बंधन होते, त्याबद्दल नवीन कायद्यात उल्लेख नाही. या तरतुदीला राज्य सरकारांवर सोडले आहे. म्हणजे जणूकाही राज्यांनिहाय विषारी पदार्थांचे नियम वेगळे असू शकतात. सुरक्षेच्या नावाने बनवलेला हा कायदा इथेच थांबत नाही तर एखाद्या ठेकेदाराला अटींची पूर्तता न करताही विशिष्ट कामासाठी परवानगी देण्याचे स्वातंत्र्य सरकारला देतो.

### सामाजिक संरक्षण संहिता (The Code on Social Security, 2020)

भांडवलशाहीमध्ये सरकारचे काम कंपन्यांचे, मालकांचे संरक्षण करणे असते. सामाजिक संरक्षण म्हणजे कामाच्या जागेपलीकडे कामगारांच्या सामाजिक जीवनाच्या सुरक्षेकरिता तरतुदींबद्दल दिखाव्याकरिता बोलले जाते. आजवर यात आरोग्याकरिता कामगारांचा सरकारी वीमा (ई.एस.आय.), भविष्य निर्वाह निधी (पी.एफ.), आरोग्य वीमा, पेंशन अशा तरतुदींबद्दल बोलले जाई. वास्तवात देशातील 93 टक्के असलेल्या सर्वच असंघटित कामगारांना आजवर यापैकी काहीच मिळालेले नाही आणि आजार, अपघात, म्हातारपणामध्ये अत्यंत असुरक्षित स्थितीमध्ये मरायचे स्वातंत्र्य हीच सामाजिक संरक्षणाची स्थिती आहे. मोठमोठ्या कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांनाही यापैकी अनेक सुविधांपासून वंचित रहावे लागते हे वास्तव आहे.

नवीन कायद्याने कामगारांसमोरची संकटं अजूनच वाढवली आहेत. या अगोदर कामगारांच्या ट्रेड युनियनला या संदर्भातील चर्चांमध्ये भुमिका होती, जी आता संपवली गेली आहे. स्त्रियांना मातृत्व रजेचा अधिकार देण्याचा दिखावा करताना ही अट घातली आहे की एखाद्या ठिकाणी 12 महिन्यांमध्ये किमान 80 दिवस काम केलेले असेल तरच मातृत्व रजा मिळेल. देशातील बेरोजगारीची, कंत्राटीकरणाची, अस्थायी कामांची स्थिती बघता कोट्यवधी कामगार महिलांना सर्व प्रकारचे धोके पत्करत गरोदरपणात आणि आपल्या तान्ह्या बाळांसोबत कामावर येण्याची सक्ती चालूच राहिल. यापुढे जाऊन कामगारांना विविध सुविधा देण्याबद्दल हवेत अनेक गोळीबार केले गेले आहेत, पण पैसे कुठून येणार याबद्दल कायदा चुप्प आहे, तेव्हा या तरतुदी फक्त कागदावर वैचारिक भ्रम निर्माण करण्यासाठी आणि कामगारांना खोटी आशा दाखवण्यासाठीच आहेत हे स्पष्ट आहे.

### औद्योगिक संबंध संहिता (The Industrial Relations Code 2020)

औद्योगिक संबंधांचा गाभा म्हणजे मालक आणि कामगारांमधील आपापसातील संबंध. कामगारच सर्व संपत्ती पैदा करतात आणि या संपत्तीचा छोटा वाटा त्यांना मजुरी म्हणून मिळतो, तर मोठा वाटा मालक नफ्याच्या रूपाने खिशात घालतो. तेव्हा मालक आणि कामगारचे हित एक असूच शकत नाही. अशामध्ये भांडवलदारांचे नियंत्रण असलेल्या व्यवस्थेत, कामगारांच्या शोषणावर नियंत्रण यावे म्हणून ट्रेड युनियन बनवणे, मालकांशी सामुहिकरित्या वाटाघाटी करणे, मालकाने मनमर्जीने कामावर काढून टाकण्यापासून संरक्षण, संपाचा अधिकार असे अनेक अधिकार कामगार वर्गाने शतकभराच्या दीर्घ संघर्षाने मिळवले होते. पण आता मोदीने तर जाहीरच केले आहे की 'औद्योगिक वाद' हा शब्दच बरोबर नाही, कारण मालक तर कामगारांच्या चिंतेने सतत व्याकुळ असतात! भांडवलदारांच्या हितरक्षणात फौलादी शक्तीने काम करणाऱ्या मोदी सरकारने आता या कायद्याद्वारे कामगारांचे सर्व अधिकार मोडीत काढण्याचे नियोजन केले आहे.

ठेकेदारी पद्धतीला आता 'फिक्स टर्म एंप्लोयमेंट' (निश्चित कालमर्यादेचा रोजगार) अशा फसव्या नावाने आता सरकार मान्यता मिळाली आहे. आता 3 महिने, 6 महिने सारख्या अवधीकरिता कामावर ठेवून कामावरून काढून टाकण्याची मालकांना दिलेली सवलत कामगारांची स्थिती अत्यंत असुरक्षित करणार आहे.

आता 300 पेक्षा कमी कामगार असलेल्या कारखान्यांमध्ये कामगारांना काढून टाकण्याची मनमर्जी सवलत मालकांना दिली गेली आहे. पूर्वी ही मर्यादा 100 कामगार होती. देशातील किमान निम्म्याच्या वर कारखाने या मर्यादेमध्ये येतील. संप करायचा असेल तर 60 दिवस अगोदर मॅनेजमेंटला नोटीस द्यावी लागेल, आणि जर मामला एखाद्या कोर्टासमोर असेल तर संप करायला मनाई असेल. अर्थातच या 60 दिवसांच्या काळात मॅनेजमेंट सर्व प्रकारचे डावपेच आखून, कोर्टात जाऊन, नवीन भरती करून, कामगारांविरोधात षडयंत्र करायला मोकळे असेल. थोडक्यात संप करणे अशक्य केले गेले आहे.

### एका प्रदीर्घ क्रांतिकारी लढ्याची तयारी करा!

जे काही कामगार कायदे या अगोदर अस्तित्वात होते, ते 1991 च्या अगोदर म्हणजेच देशामध्ये खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाची (खाउजा) धोरणे लागू होण्याअगोदर बनले. उदाहरणार्थ, ट्रेड युनियन कायदा 1926, मजुरी देयक कायदा 1936 , किमान मजुरी कायदा 1948, मातृत्व सुविधा कायदा 1961 वा ग्रॅच्युईटी कायदा 1972, इत्यादी. 1991 मध्ये देशामध्ये खाउजाचे युग सुरू झाल्यापासून कामगार

पान 10 वर

# भांडवली व्यवस्थेला गाडण्यासाठी, आरोग्यव्यवस्थेच्या राष्ट्रीयीकरणासाठी लढण्यास सज्ज व्हा!

पान 1 वरून

मोदींनी तर कहरच केला. सकाळी बंगालमध्ये 'विशाल जनसागराचे' कौतुक करणारे मोदी सायंकाळी टीव्हीवर मास्क लावून जनतेला अंतर आणि मास्क बाळगण्याचा सल्ला देत होते! दुसरीकडे कुंभमेळ्याला परवानगी देताना भाजपचे उत्तराखंडचे मुख्यमंत्री तिरथ सिंह रावत यांनी गंगेच्या आशिर्वादाने कोव्हिड-19 पसरणार नाही असे म्हटले.

भांडवलदारांच्या मीडीयाच्या समर्थनाच्या जोरावर आपण सत्य दडवू शकतो आणि जनतेला कितीही मूर्ख बनवू शकतो यावर विश्वास असलेल्या, स्वत:ला विश्वनेता बनवण्याच्या प्रकल्पात लागलेल्या, आत्ममग्न असलेल्या फॅसिस्ट मोदी आणि भाजपायींनी विज्ञानाला धाब्यावर बसवून, राजकीय स्वार्थासाठी जनतेला मृत्यूच्या दरीत ढकलले आहे !

### वर्षभराचा कालावधी: तरीही तयारी नाहीच !

उत्तरप्रदेशामध्ये डॉक्टरांच्या 33 टक्के आणि नर्सेसच्या 45 टक्के जागा रिकाम्या आहेत. बिहारमध्ये डॉक्टरांच्या 59 टक्के, झारखंडमध्ये 55 टक्के जागा रिकाम्या आहेत. बंगाल, उत्तराखंड, पंजाब, महाराष्ट्र, छत्तिसगढ, मध्यप्रदेश, ओरिसा, राजस्थान अशा सर्व राज्यांमध्ये स्थिती वाईटच आहे. मार्च 2019मध्ये देशातील सर्व आरोग्य केंद्रांवर मिळून 58,473 आरोग्य कर्मचाऱ्यांच्या जागा रिकाम्या होत्या. प्राथमिक आरोग्य केंद्रांवर 12, 823 आरोग्य कर्मचारी, 1,933 डॉक्टर, 7,569 नर्सेस, 8,979 फार्मासिस्ट, 15,875 लॅब तंत्रज्ञ यांचा तुटवडा देशभर होता. कोव्हिडच्या पहिल्या लाटेमध्ये अनेक राज्यांनी तुलनेने जास्त पगार देऊ कोव्हिड-19 डॉक्टरांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या भरत्या करण्याचे प्रयत्न केले, परंतु ते सर्व तापुरतेच होते. कायमस्वरूपी आरोग्य यंत्रणा वाढवण्याच्या दृष्टीने काहीच केले गेले नाही. हीच परिस्थिति ऑक्सिजन, आणि लसीकरणाच्या बाबतीत आहे.

### ऑक्सिजनचा तुटवडा: जनतेच्या जीवापेक्षा उद्योगधंद्यांची काळजी

कोव्हिड अगोदर देशात 1,000 मेट्रीक टन वैद्यकीय ऑक्सिजन रोज लागत होता. पहिल्या लाटेदरम्यान सप्टेंबर 2020 मध्ये देशात प्रतिदिवस 3,000 मेट्रीक टन वैद्यकीय ऑक्सिजन वापरला जात होता. याच काळात ऑक्सिजनचे उत्पादन 6,900 मेट्रीक टन इतकेच होत होते. इतर ऑक्सिजन उद्योगात वापरला जात होता. याच काळात आरोग्य विषयक संसदीय समितीनेही ऑक्सिजनच्या मागणीनुसार पुरवठा करण्यासंदर्भात इशारा दिला होता. मार्चमध्ये देशभरामध्ये केस वाढणे सुरू झाले होते. परंतु केंद्र सरकारने उद्योगांच्या ऑक्सिजन वापरावर 22 एप्रिल रोजी निर्बंध आणले. म्हणजे हा मधला संपूर्ण काळ उद्योगांच्या ऑक्सिजन पुरवठ्याची चिंता केंद्र सरकार करत होते. इतकेच नाही तर या संपूर्ण काळामध्ये भारतातील ऑक्सिजन परदेशामध्ये निर्यातही होत होता.

या संपूर्ण वर्षभरामध्ये केंद्र सरकारने ऑक्सिजन पुरवठा वाढवण्यासाठी कोणतेही गंभीर प्रयत्न केलेलेच नाहीत. ना स्थापित ऑक्सिजन निर्मिती प्रकल्पांची क्षमता वाढवली ना नवीन प्रकल्प उभे केले. स्पष्ट आहे की आत्ता ऑक्सिजन अभावी होत असलेले मृत्यू हे केंद्र सरकारच्या नियोजनशून्यतेचे आणि उद्योगपती धार्जिण्या पावलांचेच बळी आहेत.

### लसीकरणाच्या आघाडीवरचे अपयश: लस कंपन्यांच्या नफ्याची काळजी!

देशामध्ये आजवर जवळपास फक्त 2 टक्के लोकांचेच पूर्ण लसीकरण झाले आहे आणि 11 कोटींच्यावर (8 टक्के) लोकांना एक तरी डोस दिला गेला आहे. 8 एप्रिल रोजी आरोग्यमंत्री हर्षवर्धन यांनी सांगितले की अजून 2.4 कोटी लसी तयार आहेत आणि 1.9 कोटी लसी बनत आहेत. 135 कोटी लोकसंख्येच्या देशात इतक्या कमी लसींचा परिणाम आहे की देशभरामध्ये लसींचा तुटवडा जाणवू लागला आहे. सध्याच्या दराने लसीकरण चालू ठेवले आणि लसींचा पुरवठा या दराने झाला तरी 1 वर्षाच्या आत 50 ते 60 टक्क्यांच्या वर लोकांना लस देणे शक्य होणार नाही! 60 टक्के लोकांनी 'हर्ड इम्युनिटी' येते असे मानले तरी अजून एक वर्षभर तरी भारतावर कोरोनाचे संकट कायम राहणार आहे.

**म्हणायला भारत जगातील सर्वाधिक लसी बनवणारा देश आहे.** परंतु यापुढे जाऊन हे समजले पाहिजे की पाहिजे तेवढ्या लशींचे उत्पादन आणि खरेदी करण्याचे नियोजनच केले गेलेले नाहीये. सिरमच्या कोव्हिशिल्डचे आणि भारत बायोटेकच्या कोवॅक्सिनचे मिळून जास्तीत जास्त उत्पादन महिन्याला 8 ते 11 कोटी लशींचे होऊ शकते. हे कमी म्हणून की काय, जेव्हा देशामध्ये 11 कोटी लसी दिल्या गेल्या, त्याचवेळी देशातून 6.5 कोटी लसी इतर देशांना निर्यात केल्या गेल्या. थोडक्यात सिरमच्या नफ्याची काळजी घेतली गेली!

1 मे पासून 18 वर्षांवरील प्रत्येकाला लस देण्याचे धोरण जाहीर झाले आहे. या लसी सर्वांना निश्चितपणे मोफत मिळणार नाहीयेत ! सिरम इंस्टीट्यूट जी कोव्हीशिल्ड लस बनवते त्यांनी खाजगी दवाखान्यामध्ये रु. 600 दर जाहीर केला आहे. हीच कंपनी जगातील इतर अनेक देशांना यापेक्षा स्वस्तात लस पुरवत आहे. कंपनीचे मालक पूनावाला यांनी जाहीर केले होते की रु. 150 दराने सुद्धा लस विकून त्यांना नफा होईल, तरीही कंपनीने राज्य सरकारांनाच रु. 400 मध्ये लस देऊ केली आहे. भारत बायोटेकची कोव्हॅक्सिन तर बाजारात 1200 रुपयांना मिळणार आहे. यातून दिसून येते की सरकारने सिरम-बायोटेक सारख्या कंपन्यांना प्रचंड नफेखोरीची परवानगी दिली गेली आहे.

### कोव्हिड-19 काळात आरोग्य व्यवस्थेची प्रचंड नफेखोरी

रेमडेसिवीर इंजेक्शनचा काळ्या बाजारात दर दीड लाखांवर गेला आहे. टॉमिसीझुलॅबच्या एका इंजेक्शनचा दर 30 ते 40 हजारांवर गेला आहे. काही औषध उत्पादकांनीच इंजेक्शनच्या किमती अनेक पट वाढवल्या आहेत. ऑक्सिजन सिलेंडर सुद्धा काळ्या बाजारात अव्वाच्या सव्वा भावाला विकले गेले आहेत. हॉस्पिटल्स फक्त डमिट करताना दोन-तीन लाख रुपये डिपॉझिट करण्यास सांगत आहेत. डमिट झालेले व्यक्ती अनेक लाखांचे बिल घेऊनच बाहेर निघत आहेत. पहिल्या लाटेमध्ये तर मास्क सुद्धा शेकडो रुपयांना विकले गेले आणि सॅनिटायझर 10 पट किंमतींना विकले गेले. अनेकदा गरज नसतानाही रेमडेसिवीर इंजेक्शन सांगून डॉक्टर आणि हॉस्पिटल्सनी खोऱ्याने कमिशन खाल्ले आहे आणि तुटवडाही निर्माण केला आहे. ज्याला जसे लुटता येईल तशी आरोग्यक्षेत्रा मध्ये लूट चालली आहे.

या सर्व लूटीला सरकारी मान्यता आहे. औषध कंपन्यांना, हॉस्पिटल्सना मनमान्या पद्धतीने लुटू दिल्यानंतरच काही ठिकाणी सरकारने किमतीवर निर्बंध आणणे चालू केले. हे सर्व सरकार थांबवू शकत नव्हते? शेतकऱ्यांच्या जमिनी सक्तीने ताब्यात घेऊ शकणारे सरकार, नोटबंदी लादू शकणारे सरकार, लॉकडाऊनमध्ये लोकांवर लाठ्या चालवणारे सरकार औषध कंपन्या, हॉस्पिटल्स का ताब्यात घेऊ शकत नाही?

### लॉकडाऊनमुळे नाही तर भांडवलशाहीमुळे कामगारांचे हाल झालेत!

देशामध्ये वर्षभर सर्वांना पुरेल इतका धान्यसाठा आहे. वाहतुकीची अत्याधुनिक साधने उपलब्ध आहेत. तेव्हा प्रत्येक व्यक्तीला घरोघरी जाऊन जीवनावश्यक गरजा भागवणे पहिल्या लॉकडाऊन वेळी सुद्धा शक्य होते. घरी जाऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला वाहनाची सोय करणे शक्य होते. गायब होती ती कामगार वर्गाप्रती सरकारी इच्छाशक्ती.

दुसऱ्या लॉकडाऊन वेळी सुद्धा, लसीकरण न करता दीर्घकाळ मोठमोठे उद्योग चालू ठेवले गेले. निर्बंध आणण्यामागे नेहमीच 'गरिबांच्या पोटावर पाय येईल' सारखी कारणे उद्योगपती (यांना कधीपासून काळजी लागली गरिबांची?) आणि सरकारे देत होती. गरिबांची खरोखरच काळजी होती तर का नाही सरकारी यंत्रणा जीवनावश्यक गरजा भागवायला कामी लावली? का नाही प्रत्येक माणसाच्या खात्यात महिना रु. 10,000 बेरोजगारी भत्ता जमा केला?

आधार सारख्या योजनांद्वारे नाही म्हटले तरी सर्व जनतेची माहिती संगणकावर उपलब्ध आहे. शेकडो कंपन्या आज कोट्यवधी ग्राहकांना एका 'हेल्पलाईन' नंबरद्वारे सुविधा विकत आहेत. सर्व हॉस्पिटल्स, कंपन्यांची माहिती सहज उपलब्ध होऊ शकते. तरीही लोकांना का दारोदार भटकावे लागत आहे? सरकारने मनात आणले असते तर **अगदी सहजपणे एका देशव्यापी फोन नंबरद्वारे सर्व वैद्यकीय सुविधेची माहिती जनतेला देऊ शकले असते,** मनात आणले असते तर सर्व औषधे दवाखान्यांमध्येच उपलब्ध करवली असती आणि नातेवाईकांना वणवण करावी लागले नसती!

सरकारची इच्छाशक्ती गायब नाहीये, तर ती फक्त नफा कमावणाऱ्या ऐतखाऊ उद्योगपती, औषध कंपन्या, हॉस्पिटल्सच्या बाजूने आहे! तेव्हा लॉकडाऊन वा तत्सम निर्बंधांमुळे नाहीत तर भांडवलदारांच्या हितासाठी काम करणाऱ्या राज्यसत्तेने कामगार वर्गापुढचे संकट उभे केले आहे.

### भांडवली उत्पादन व्यवस्था न्याय देऊ शकत नाही!

विचार करा. ज्या देशामध्ये सामान्य काळात पंचतारांकित हॉटेलसारख्या हॉस्पिटल्सना धंद्याचा मुक्त परवाना दिलेला आहे, डॉक्टरांना-दवाखान्यांना मनमर्जी फी घेऊन, खाटांच्या दरांपासून ते औषधांपर्यंत मनमानी लूट करण्याची परवानगी आहे, औषध कंपन्या एकेका औषधामागे कैक पटींनी दररोज नफा कमावतात आणि टेस्टींग/चाचण्या/औषधांमध्ये कमिशन खोरी शिवाय चालणारे डॉक्टर, दवाखाने नावालाही सापडत नाहीत, सरकारने आरोग्य सेवेला खाजगी उद्योगांच्या चरण्याचे कुरण बनवलेले आहे, देशातील 90 टक्के गरिब कामगार-कष्टकरी इलाजावाचून मरण्याला हतबल आहेत, हॉस्पिटल्समध्ये नफा वाढवण्यासाठी कर्मचाऱ्यांकडून रोज 10-12-14 तास काम करवून घेतले जाते, आरोग्य सुविधेवर 1 टक्का सुद्धा खर्च सरकार करत नाही, आरोग्य सेवेवरचा मुख्य खर्च सरकारला नाही तर प्रत्येक माणसाला स्वत:च्या खिशातून करावा लागतो, तिथे जर आपण कोव्हिड सारख्या संकटकाळात प्रत्येक व्यक्तीला न्यायपूर्ण इलाज मिळेल अशा चमत्काराची आशा ठेवत असू तर ती फोलच ठरणार! आपण वर पाहिलेच की हॉस्पिटल बेड पासून ते ऑक्सिजन वा रेमडेसिवीर सारख्या औषधांपर्यंत प्रत्येक गोष्टीमध्ये केंद्र-राज्य सरकारांनी फक्त खाजगी उद्योगांच्या नफ्याची काळजी पाहिली आहे! तेव्हा **कोव्हिड-19 च्या दुसऱ्या लाटेचे अभूतपूर्व संकट हे नफ्याच्या लालसेने पैदा केलेले संकट आहे!**

**बाजाराची अर्थव्यवस्था प्रत्येक क्षेत्राला बाजारू करत जाते.** मानवी जीवन सुद्धा बाजारात खरेदी-विक्रीची गोष्ट बनते. **बाजारात ज्याप्रकारे बटाट्याचे दर लावले जातात, तशी आज माणसाच्या आरोग्याची, जीवाची बोली लावली जात आहे!** आज देशात संपूर्ण आरोग्य व्यवस्था बाजाराच्या हवाले केली गेलेली आहे. कोव्हिड-19 सारखा आपात्काळ तर सोडाच, सामान्य काळातही देशामध्ये पैसेवाल्यांनाच इलाज मिळू शकतो हीच सामान्य स्थिती आहे. कोरोनासारख्या संकटकाळात याचा फटका अनेक मध्यमवर्गीय आणि उच्चवर्गीयांना सुद्धा बसत आहे, नाहीतर देशात कोट्यवधी गरिब इलाजावाचून नियमितपणे मरत असतात आणि त्याची कुठेही 'ब्रेकिंग न्यूज' होत नाही. अशा आरोग्य व्यवस्थेकडून कोव्हिड-19 सारख्या संकटामध्ये सर्वांच्या इलाजाची सोय होणे अशक्य आहे.

या बिभत्स व्यवस्थेला आमूलाग्र बदलणे, पूर्णत: सार्वजनिक खर्चातून चालणारी, प्रत्येक व्यक्तीला समान आणि मोफत इलाजाची हमी देणारी, सर्व डॉक्टर्स-नर्सेस-कर्मचाऱ्यांना सन्मानाचा रोजगार देणारी देशव्यापी आरोग्य व्यवस्थाच कोव्हिड-19 सारख्या आजारांशी लढण्याची खरी हमी देऊ शकते. अशा आरोग्य व्यवस्थेची खरी हमी फक्त अशीच आर्थिक-सामाजिक संरचना देऊ शकते जिच्यावर कामगार वर्गाचे अधिनायकत्व असेल, ना की भांडवलदार-मालक वर्गाचे जो फक्त नफा जाणतो.

**कामगार वर्गाचे महान शिक्षक कॉम्रेड लेनिन म्हटले होते की "फक्त वैज्ञानिक आणि कामगार वर्ग यांच्यातील सहयोग दमनकारी दारिद्र्य, आजार आणि गलिच्छतेपासून मुक्ती देऊ शकतो."**

**अशा सहयोगासाठी** आवश्यक आहे की कामगार वर्गाने आमूलाग्र क्रांतिकारी समाजपरिवर्तनाच्या, भांडवली व्यवस्थेला उखडून फेकणाऱ्या क्रांतिकारी आंदोलनामध्ये संघटित व्हावे. कोव्हिड-19 च्या आपदेने निश्चितपणे आपणा सर्वांना शोकमग्न केले आहे आणि काहीजण हताश, निराश होत आहेत. परंतु या शोकाला पुन्हा निर्माण होऊ द्यायचे नसेल तर आपण क्रांतिकारी व्यवस्था परिवर्तनासाठी कंबर कसून लढायला सज्ज होणे आवश्यक आहे.

# पॅरिस कम्युन: पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा (पुष्प दुसरे)

आज भारतातच नाही, तर संपूर्ण दुनियेत कामगार भांडवली लुटखोरांच्या वेगवान होत चाललेल्या हल्ल्यांचा सामना करत आहेत, आणि कामगार आंदोलन विखुरलेपण, साचलेपणा, आणि हताशेने ग्रासलेले आहे. अशामध्ये इतिहासाची पाने उलटून कामगार वर्गाच्या गौरवशाली संघर्षापासून शिकण्याचे आणि त्यांच्यापासून प्रेरणा घेण्याचे महत्व फार वाढते. **आजपासून 150 वर्षे अगोदर, 18 मार्च 1871 ला फ्रांसची राजधानी पॅरिस मध्ये पहिल्यांदा कामगारांनी आपले शासन कायम केले. याला पॅरिस कम्युन म्हटले गेले.** त्यांनी शोषकांद्वारे पसरवल्या जाणाऱ्या या विचारांना ध्वस्त केले की कामगार राज्यकारभार चालवू शकत नाहीत. पॅरिसच्या बहादूर कामगारांनी फक्त भांडवली सत्तेच्या रथालाच उलटवले नाही तर 72 दिवसांच्या शासनाच्या दरम्यान येणाऱ्या दिवसांचे एक छोटे मॉडेल जगासमोर प्रस्तुत केले आणि दाखवले की समाजवादी समाजामध्ये भेदभाव, असमानता, आणि शोषण कशाप्रकारे समाप्त केले जाईल. पुढे चालून 1917 च्या रशियन कामगार क्रांतीने या क्रांतीचा पुढचा टप्पा रचला.

कामगार वर्गाच्या या साहसी कारवाईने फक्त फ्रांसमधीलच नाही तर जगातील भांडवलदारांचे काळीज थरथरले. त्यांनी कामगारांच्या पहिल्या सत्तेला सुरूंग लावण्यासाठी जीवतोड प्रयत्न केले आणि शेवटी कामगारांच्या कम्युनला त्यांनी रक्ताच्या नद्यांमध्ये न्हाऊन काढले. पण कम्युनचे सिद्धांत अमर झाले.


पॅरिस कम्युनच्या पराजयातूनसुद्धा जगातील कामगार वर्गाने महत्वाचे धडे घेतले. पॅरिसच्या कामगारांचे बलिदान कामगार वर्गाला सतत आठवण देत राहील की भांडवलशाहीला नष्ट केल्याशिवाय त्यांना मुक्ती मिळू शकत नाही.

पॅरिस कम्युनला 150 वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने 'कामगार बिगुल' च्या या अंकापासून आम्ही जगातील पहिल्या कामगार राज्याच्या सचित्र कथेची सुरुवात करत आहोत. 'मजदूर बिगुल' मध्ये मार्च 2012 पासून प्रकाशित झालेल्या धारावाहिक कथेचा अनुवाद पुढील अंकांमध्ये आम्ही देत राहू. — संपादक मंडळ

या मालिकेच्या **पहिल्या पुष्पामध्ये** आपण पाहिले की 'भांडवलाच्या जुलमी, पाशवी सत्तेविरोधात कामगार लढायला कसे शिकले'. मशिनी तोडून आपला राग काढण्यापासून सुरू होऊन कामगारांचा संघर्ष चार्टीस्ट आंदोलनापर्यंत पोहोचला. हे कामगारवर्गाचे पहिले व्यापक आंदोलन होते आणि अयशस्वी होऊनही ते एक प्रेरणादायी उदाहरण बनले.

## कामगार वर्गाच्या वाढत्या संघर्षाचा आणि त्याच्या मुक्तीच्या विचारधारेचा जन्म

1. 1840 च्या दशकात इंग्लंड्मध्ये कामगार चळवळीचे दोन भाग झालेले होते. त्यापैकी एक होता चार्टीस्ट आणि दुसरा होता समाजवादी. चार्टीस्ट लोक सिंद्धांताच्या बाबतीत थोडे मागासलेले होते; पण ते खरे कामगार वर्गीय होते आणि आपल्या वर्गाचे प्रतिनिधी होते. दुसरीकडे समाजवादी दूरदृष्टे होते. कामगारांची स्थिती सुधारण्यासाठी व्यावहारिक मार्ग सुचवत असत, पण ते भांडवलदार वर्गातून आलेले असल्यामुळे कामगारांमध्ये पूर्णत: मिसळत नसत. फ्रेडरिक एंगल्स यांनी म्हटल्याप्रमाणे चार्टीस्ट आणि समाजवादी यांची एकता हे कामगार चळवळीचे पुढचे पाऊल होते आणि या गोष्टीची सुरवात तेव्हाच झाली होती. कामगार आपल्या चळवळीमध्ये विचारांचे महत्व समजू लागले होते आणि ट्रेड युनियन्स, चार्टीस्ट व समाजवादी असे सर्व स्वतंत्रपणे किंवा मिळून कामगारांसाठी असंख्य शाळा, पुस्तकालये, वाचनालये, इत्यादी चालवत असत. भांडवली सरकारे याला धोकादायक समजत असत आणि अनेकदा त्यांच्यावर बंदीही घालत असत. परंतु कामगारामध्ये हळूहळू विकसित होत असलेल्या राजकीय चेतनेच्या प्रसाराला थांबवणे शक्य नव्हते



1848 मध्ये लंड्नच्या एका चौकात कामगारांच्या "साहित्यिक आणि वैज्ञानिक संस्थेची" बैठक



1844 ला जर्मनीमध्ये कापड उद्योगाचे प्रमुख केंद्र असलेल्या सिलेसिया शहरामध्ये विणकर कामगारांनी गरिबी आणि उपासमारीमुळे हताश होऊन मोठा विद्रोह केला. त्यांनी सिलेसिया शहराचा ताबा घेतला आणि त्यांना चिरडण्यासाठी फ़ौजेला पाचारण करण्यात आले. अनेक कामगारांना गोळ्या घातल्या गेल्या तर अनेकांना कैद आणि चाबकाच्या फटकाऱ्यांच्या शिक्षा सुनावल्या गेल्या. इतिहासात या विद्रोही आंदोलनाला खूप महत्व आहे कारण विणकर कामगारांनी केलेल्या रास्त मागण्या, दिलेल्या घोषणा आणि कामगारांनी केलेल्या राजकीय कारवाया यामुळे समाजातील कामगारांची स्थिती आणि भूमिका याबद्दल त्यांची समज जोमाने वाढत होती असे दिसते. वरील चित्रात आपल्या मागण्या मांडण्यासाठी जात असलेल्या विणकर कामगारांना दाखवले आहे. हे चित्र जर्मनीच्या प्रसिध्द चित्रकार आणि कामगार आंदोलनाच्या समर्थक कॅथी कॉलविट्झ यांनी बनवले आहे.

2. कामगार आदोंलनाचा एक मजबूत प्रवार होण्याअगोदरच समाजवादाचा विचार अस्तित्वात आला होता. परंतु याला "काल्पनिक" समाजवाद म्हटले गेले कारण त्यामागे काही ठोस वैज्ञानिक विचार व मार्गाची योग्य समज नव्हती. या काळातील बहुतांश प्रगतिशील लोकांना आशा होती की यामुळे राजे-जहागिरदार-सामतांच्या अत्याचारांचा अंत होईल आणि विवेक, स्वातंत्र्य व न्यायाचे राज्य स्थापन होईल. वास्तवात सामंती अत्याचार व जोर जबरदस्तीची जागा निर्दय भांडवली शोषणाने आणि धनसंपत्तीच्या शासनाने घेतली. भांडवली विकासाच्या सुरुवातीच्या काळातच काही असे विचारक आणि दूरदृष्टे लोक होते की त्यांनी भांडवली व्यवस्थेच्या अवगुणांना हेरले होते आणि एका चांगल्या व्यवस्थेसाठी आवाज उठवला होता की जी सगळ्यांसाठी न्याय व बंधुत्व या तत्वांवर उभी असेल.




रॉबर्ट ओवेन




सेंट सायमन

या महान चितंकामध्ये सर्वोच्च स्थान फ्रांसचे सेंट-सायमन आणि इंग्लंडचे चार्ल्स फुरिये आणि रॉबर्ट ओवेन यांचे आहे. त्यांनी भांडवली व्यवस्थेची कठोर आणि खरी टीका केली आणि तिच्या जागी भविष्यात न्यायपूर्ण समाजाची कल्पना सादर केली. सगळ्यात मोठी गोष्ट ही की त्यांनी सामान्य लोकांना भांडवलशाही व्यवस्थेने घातलेल्या बेड्यांमधून स्वत:ला मुक्त करण्यासाठी आवाहन केले. परंतु ते हे समजू शकले नाहीत की भांडवली व्यवस्था हटवून नवा समाज स्थापन करण्यासाठी योग्य रस्ता कोणता असेल. त्यांनी जे काही सुचवले ते भोळेपणाने व अव्यावहारिक असे एक स्वप्न होते. त्यांना स्वत:ला हा विश्वास नव्हता की कामगार वर्ग हाच ती सामजिक शक्ती आहे जी शोषणाची साखळी तोडून स्वत:ला आणि पूर्ण मानवजातीला मुक्त करू शकेल. त्यांना वाटत होते की समाजातील प्रबुद्ध लोकांनी एकत्र येऊन जबाबदारी घेऊन कामगारांचा या दुर्दशेतून उध्दार करावा. परंतु या महान चिंतकाच्या कार्याशिवाय कामगाराच्या मुक्तीसाठीचा वैज्ञानिक सिध्दांत अस्तित्वात येऊ सुद्धा शकत नव्हता.




चार्ल्स फ़ुरिये



रॉबर्ट ओवेन यांनी स्थापित केलेली वस्ती "न्यु लेनार्क". येथे एक मोठी सूत गिरणी होती. येथे काम करणारे 2500 कामगार व त्याची कुटुंबं रहात असत. त्यांना घेऊन ओवेन यांनी समाजवादाच्या आपल्या "आदर्शा"ला लागू करण्याचे प्रयोग केले.

# पॅरिस कम्युन: पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा (पुष्प दुसरे)




कार्ल मार्क्स (जन्म 5 मे 1848; निधन 14 मार्च 1883) ने आपले सर्व आयुष्य तरूणपणापासूच कामगारांच्या मुक्तीसाठी समर्पित केले. आपल्या क्रातिकारी विचारांमुळेच त्यांना वयाच्या 25 व्या वर्षी आपला देश सोडावा लागला त्यांनी त्याचे उर्वरित आयुष्याचा मोठा भाग दुसऱ्या देशात व्यतित झाला. प्रत्येक देशातील भांडवली सरकार त्यांना घाबरत होते; परंतु त्यांना सगळ्या जगभरातील कष्टकऱ्यांकडून खूप प्रेम आणि सन्मान मिळाला.

3. जेव्हा कामगार आंदोलनाने बराच अनुभव प्राप्त केला आणि कामगार वर्ग जास्त योग्य पद्धतीने संघटित झाला तेव्हा तेव्हा असा एक वैज्ञानिक सिद्धांत समोर आला जो मानवतेला मुक्तीच्या योग्य दिशेने घेऊन जाऊ शकत होता. या सिध्दांताने हे दाखवले की आत्तापर्यंतचा सामाजिक विकास कोणकोणत्या टप्प्यांमधून झाला आहे आणि सामाजिक विकासाच्या सगळ्यात वरच्या पायरीवर म्हणजे “कम्युनिझम”कडे जाण्याचा रस्ता कोणता असेल. या सिध्दाताचे प्रणेते होते कामगार वर्गाचे महान नेते कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एंगल्स. जर्मनीत जन्मलेल्या या दोन अद्भूत प्रतिभाशाली व्यक्तींनी तरुणपणीच क्रांतिकारी संघर्षासाठी तन-मन अर्पण केले. मार्क्स आणि एंगल्स यांनी वैज्ञानिक समाजवादाचा सिध्दांत मांडला आणि कामगार वर्गाच्या संघर्षाची कार्यनिती बनवली. त्यांनी म्हटले की "कामगारांकडे पायातील बेडी शिवाय गमावण्यासारखे काहीच नाही." मार्क्सवादाने सर्व जगाला दाखवले की कामगार वर्गच सर्वात “क्रांतिकारी” वर्ग आहे आणि खाजगी मालकीच्या व्यवस्थेला नष्ट करण्यासाठीच्या संघर्षामध्येतो सर्व कष्टकरी जनतेचे नेतृत्व करेल. परंतु हा नवा सिध्दांत दुनिया बदलण्यासाठी जबरदस्त ताकद तेव्हाच बनू शकला असता जेव्हा तो लोकांच्या मनाची पकड घेऊ शकला असता.



1844 मध्ये विविध समाजवादी कार्यकर्त्यांबरोबर चर्चा करताना मार्क्स आणि एंगल्स



फ्रेडरिक एंगल्स (जन्म 25 नोंव्हेंबर 1820; मृत्यू 5 ऑगस्ट 1895) एका कारखानदाराचा मुलगा असूनही ज्यानी आपली शक्ती आपल्या पित्याच्या इच्छेचे पालन करण्यासाठी व पैसे कमावण्यासाठी न वापरता, आपली सगळी ऊर्जा क्रांतिकारी संघर्षासाठी वापरली. मार्क्स व एंगल्स याची ओळख 1844 मध्ये झाली आणि तेव्हापासून कामगार वर्गाच्या या दोन महान नेत्यांच्या अशा अतूट मित्रतेची सुरूवात झाली, जी मैत्री इतिहासात एक दाखला बनली आहे. या दोघानी आपली सगळी प्रतिभा व ऊर्जा भांडवलशाहीच्या दासतेतून मानवतेच्या मुक्तीच्या उद्दिष्टाला पुढे नेण्यासाठी लावली.

4. मार्क्स व एंगल्स याच्या अगोदर कामगार आंदोलन आणि समाजवादाचा विकास हा वेगवेगळ्या मार्गाने होत होता. 1847 मध्ये मार्क्स आणि एंगल्स यांच्या सहयोगाने पहिल्या आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचीची— "कमुनिस्ट लीग"ची—स्थापना झाली आणि एका नव्या घोषणेचा जन्म झाला— "जगातील कामगारांनो एक व्हा!" या लीग तर्फे मार्क्स व एंगल्स यांनी 'कम्युनिस्ट घोषणापत्र' तयार केले जे 1848 मध्ये छापून तयार झाले. या छोट्या पुस्तिकेने मागील 160 वर्षांमध्ये जग बदलून टाकले आहे. आज जगातील सगळ्या भाषांमध्ये या पुस्तिकेच्या कोट्यवधी प्रती छापल्या गेल्या आहेत. परंतु जेव्हा पहिल्यांदा हे घोषणापत्र प्रसारित झाले तेव्हा त्याचा जबरदस्त परिणाम झाला. त्यांनतर कामगार आंदोलन व समाजवाद हे दोन वेग-वेगळे मार्ग न राहता एकमेकात मिसळून एक अपराजेय शक्ती बनले.



'कम्युनिस्ट लीग'च्या केंद्रीय समितीची बैठक, सर्वात डावीकडे बसलेले कार्ल मार्क्स




'कम्युनिस्ट घोषणापत्र'च्या पहिल्या आवृत्तीचे मुखपृष्ठ

5. 19 व्या शतकातील 4थ्या दशकात झालेल्या अनेक जनविद्रोहांना जबरदस्तीने चिरडल्यानंतर युरोपमध्ये सामाजिक, राजकीय प्रतिक्रियेचा आणि दमनकारी पोलीस यंत्रणेचा काळ आला. परंतु दमनामुळे दीर्घकाळापासून दबलेल्या सामाजिक शक्ती सतत मजबूत होत होत्या. 1848 मध्ये असंतोषाचा ज्वालामुखी फुटला. सगळ्या युरोपमध्ये उलथापालथी झाल्या, ज्यामध्ये प्रत्येक ठिकाणी सर्वात पुढे कामगार वर्ग होता. या क्रांतीचा पहिला स्फोट सिसिली मध्ये झाला परंतु त्यानंतर एकेक करून हे क्रांतीचे लोण फ्रान्स, ऑस्ट्रिया, रशिया, जर्मनी, इटली, स्पेन, हंगेरी, पोलंडपासून सगळ्या युरोपभर पसरले आणि घृणित, निरंकुश राजकीय व्यवस्था, सम्राट, आणि मंत्र्यांनाही भस्मसात करून गेले.

परंतु दिमाखदार पराक्रमी संघर्ष करूनही मेहनती कामगार वर्गाला हार मानावी लागली. कामगाराच्या वाढत्या शक्तीला आणि झुंझार चेतनेला घाबरून भांडवलदार वर्गाने प्रत्येक प्रकारची गद्दारी व धोकेबाजी करून क्रांतिकारी आदोलनाच्या पाठीत सुरा खुपसण्याचे काम केले. दुसऱ्या बाजूला कामगार वर्गाच्या कमजोरीचे मूळ कारण हे होते की जबरदस्त क्रांतिकारी लढावू वृती असूनही तो चांगल्या रितीने संघटित नव्हता आणि त्यांना आपल्या ऐतिहासिक कार्यभाराची व धेयाची योग्य समज नव्हती. 1848च्या क्रांत्यांचा शेवट पराजयामध्ये झाला परंतु युरोपाच्या येणाऱ्या इतिहासाला त्यांनी बदलून टाकले. सोबतच या क्रांत्यांनी युरोपातील कामगार वर्गाला राजकीय संघर्षाचा अमूल्य अनुभव दिला. त्यांनी जगाला दाखवून दिले की एका मोठ्या व ताकदवान सामाजिक शक्तीच्या रूपाने कामगार वर्ग समोर आल्यावर आता भांडवलदार वर्ग प्रगतिशील राहिलेला नाही आणि तो एका प्रतिक्रांतिकारी शक्तीमध्ये रुपांतरीत झाला आहे.



फ्रांस मध्ये 1848 मध्ये क्रांतीची सुरुवात होताच जनतेने राजमहालावर हल्ला केला, जिथून राजाने अगोदरच पलायन केलेले होते. लोक राजसिंहासनला खेचत रस्त्यावर घेऊन आले आणि त्याला आग लावली.

# पॅरिस कम्युन: पहिल्या मजूर राज्याची सचित्र कथा (पुष्प दुसरे)



1848 च्या क्रांतीदरम्यान लुटखोर व अत्याचारी शासनाला लोकांनी लाथ मारून बाजूला सारले होते. त्यावेळचे हे प्रसिध्द कार्टून आहे. याच काळात प्रसिध्द रशियन क्रांतीकारी लेखक अलेक्झांद्र हर्जन यांनी लिहिले होते "हा अद्भूत काळ आहे. वर्तमानपत्र हातात घेताना माझे हात थरथर कापायला लागतात. — **रोजच अनपेक्षित घटना घडत आहेत, वीजेची नवी गर्जना ऐकायला मिळत आहे. एकतर मानव जातीचा उज्वल पूनर्जन्म होणार आहे किंवा जगबुडीचा दिवस येत आहे. लोकांच्या मनात एक नवी ताकद निर्माण झाली आहे, जून्या आशा परत जाग्या झाल्या आहेत आणि एक असे साहस मनावर स्वार झाले आहे की ते काहीही करू शकतात."**



पॅरिस मध्ये जून विद्रोह करताना कामगारानी काढलेला मोर्चा. या घटनेचे साक्षीदार कार्ल मार्क्स ने लिहिलेले आहे की: "कामगारांपुढे कुठलाही पर्याय उरला नव्हता–ते भुकेने मरतील किंवा संघर्ष करतील! त्यांनी 22 जून रोजी मोठ्या उठावाने उत्तर दिले, जे आधुनिक समाजाचे विभाजन करणाऱ्या दोन वर्गामधील पहिले मोठे युध्द होते. हे भांडवलशाही व्यवस्थेच्या संरक्षण वा संहाराचे युध्द होते." भांडवलदारांच्या सरकारने पाशवी दमन केले. रस्त्यावर चाललेल्या लढ्यामध्ये 500 कामगार मृत्यूमुखी पडले . पण त्यानंतरच्या काही महिन्यांमध्ये 11 हजार कामगाराना गोळ्या घालून ठार मारण्यात आले

6. कामगारानी आपल्या संघटना बांधणे सुरू केले. संप अधिकाधिक व्यापक होत गेले. समाजवादी मंडळांच्या आणि गटांच्या स्थापना होऊ लागल्या आणि कामगारानी आपल्या समस्यांना फक्त स्वत:च्याच कारखान्याच्या, शहराच्या, देशाच्या संकुचित नजरेतून बघणे बंद केले. 19 व्या शतकातील 7व्या दशकापर्यंत कामगार आंदोलन जागतिक स्तरावर आपल्या शक्तींना एकजूट करण्यासाठी सज्ज झाले होते. आता कष्टकरी वर्गाला एका नव्या आंतरराष्ट्रीय संघटनेमध्ये एकजूट करण्याची वेळ आली होती.

28 सप्टेंबर 1864 रोजी लंडन मध्ये झालेल्या एका सभेत ब्रिटन, फ्रांस, जर्मनी, इटली आणि इतर काही देशातील कामगारांनी भाग घेतला होता. त्यांनी आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेची(इंटरनॅशनल वर्कींग मेन्स असोसिएशन)स्थापना केली, जी इतिहासात "पहिल्या आतंरराष्ट्रीय" नावाने प्रासिध्द झाली आहे. कार्ल मार्क्स व फ्रेडरिक एंगल्स हे आंदोलनाचे मुख्य राजकीय व वैचारिक नेते होते. युरोपातील विविध देशांमधील आणि अमेरिकेतील अनेक ट्रेड युनियन्स, कामगार सोसायट्या, श्रमिक शिक्षण मंडळ आणि विविध कामगार "पहिल्या आंतरराष्ट्रीय"मध्ये सामिल झाल्या. या सर्व देशांमध्ये आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या राष्ट्रीय शाखा प्रस्थापित झाल्या आणि थोड्या कालावधीतच इंटरनॅशनल हे एक व्यापक आंतरराष्ट्रीय कामगार संघटना बनले. या काळात भारतात कारखाने नुकतेच सुरू झाले होते, त्यामुळे कामगारांची संख्या खूप कमी होती आणि विखुरलेली होती. परंतु 20 वर्षानी जेव्हा भारतात खूप कारखाने उभे राहिलेले होते, ज्यांमध्ये खूप मोठ्या संख्येने कामगार काम करत होते तेव्हा संघटित होण्याच्या विचाराच्या प्रचारासाठी "आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने" आपले दोन प्रतिनिधी भारतात कलकत्त्याला पाठवले होते.



या ऐतिहासिक भाषणाचे काही अंश:

"भाड्याने घेतलेले श्रम अस्थायी आणि हलक्या प्रकाराचे श्रम आहे. त्याला इच्छापूर्वक केलेल्या, तत्पर मस्तिष्काने आणि प्रसन्न मनाने केलेल्या सहयोगपूर्ण श्रमासमोर समाप्त व्हावे लागेल…"

"मोठ्या प्रमाणात आणि आधुनिक विज्ञानानुसार चालणारे उत्पादन मालकांच्या वर्गाच्या अस्तित्वाशिवाय केले जावू शकते…"

"त्यांच्याजवळ (कामगारांजवळ-संपादक) यशाचा एक मार्ग आहे—त्यांची संख्या. परंतु संख्या तेव्हाच कामी येते जेव्हा ती आपापसात मिळून एकजूट होईल आणि ज्ञान तिचे नेतृत्व करेल…"

"म्हणून राजकीय सत्तेवर ताबा घेणे हे कामगार वर्गाचे महान लक्ष बनले आहे. "

या भाषणाचा शेवट या शब्दांनी झाला— " जगातील कामगारांनो एक व्हा."




**कम्युन जिंदाबाद!**
**पुढील अंकामध्ये कम्युनची स्थापना आणि तिच्या अमर सिद्धांतांच्या जन्माची कहाणी`**

# तुमच्या सदाचाराचा ऱ्हास

पान 11 वरून

करणार? जर कोणाला लाच खाण्यात संकोच वाटत असेल तर तो यामुळेच की लाच कमी आहे किंवा चोरी लपवणे अवघड जाईल या भितीने. अनुचित आहे म्हणून लाच न खाणारे लोक तर आता मुश्किलीनेच मिळतात. जिल्ह्यांमधल्या छोट्या-मोठ्या अधिकाऱ्यांबद्दल तर बोलूच नये. हायकोर्टाचे जज्ज सुद्धा लाच घेताना सापडले आहेत आणि हे खटले लढणाऱ्या जनतेला चांगलेच माहित आहे. छोट्या आणि मोठ्या साहेबांना सुद्धा घोडदौडीचे घोडे, किमती हार, आणि इतर मोठ्या भेटवस्तू देऊन कामं करवली गेली आहेत. एका संस्थानाच्या विरोधात अनेक मोठमोठे पुरावे जमा झाले होते. रेकॉर्ड ठेवणाऱ्या अधिकाऱ्याला एकत्रच काही लाख दिले आणि दुसऱ्या दिवशी दिसले की सगळे पुरावे गायब!

आजकाल तर राज्यच थैलीचे आहे. सत्तेवर पकड त्याची आहे ज्याच्याकडे पैसा आहे. कायदा बनवणारे तेच आहेत ज्यांच्याकडे चांदीची ताटं आहेत. इंग्लडचे थैलीधारक हिंदुस्तानाचे मालक आहेत. ते कधी असा कायदा बनणे पसंद करणार नाहीत ज्यामुळे त्यांच्या थैलीला बाधा पोहोचेल. देशविदेशातील दळणवळणाची साधने, जहाजं आणि रेल्वे याच दृष्टीने चालवल्या जातात. भारताच्या रेल्वेचे पण एक वेगळेच व्यवस्थापन बनवले आहे, हा विचार करून की भारतीय राजकारण्यांचा तिच्यावर दबाव पडू नये. कायद्यांची भरमार आहे. प्रत्येक वर्षी आपल्या देशात शेकडो बनवले आणि सुधारले जातात. पण ते यासाठी नाही की मनुष्य इमानदारीने कमावलेल्या आपल्या संपत्तीचा स्वत: उपभोग घेऊ शकेल. त्यांचा अर्थ इतकाच असतो की धनिकांच्या हितासाठी चालणाऱ्या या शासनाच्या मदतीसाठी अजून काही लायक माणसं कशी विकत घेता येतील? कशाप्रकारे आरडा-ओरडा करणाऱ्या काही जमातींचे तोंड बंद करता येईल? लायक व्यक्तींना सरकारी मोठमोठ्या पदांवर याकरिता बसवलेले नसते की त्यांनी आपल्या योग्यतेने जनतेला फायदा पोहोचवावा, उलट यासाठी असते की त्यांनी अनंत काळापासून चालत आलेल्या स्वार्थांच्या रक्षणासाठी सहाय्यक व्हावे. सर्वांनाच माहित आहे की सरकारी नोकऱ्यांमागे मोठमोठे पगार आणि स्थायी जीविकेसाठीच लोक पळतात. जर सरकारी संपत्तीचे न्यायपूर्वक वितरण करायचेच आहे तर त्याचे मोठे हक्कदार तर गरिबांची मुलं आहेत. पण आपल्याला काय दिसून येते? गरिबांच्या मुलांना तर पहिले शिकणेच अवघड आहे, शिकून योग्यता मिळवली तरीसुद्धा मोठमोठ्या नोकऱ्यांना लागणारे वशिले मिळवणे अवघड. परिणाम असा होत आहे की प्रत्येक प्रकारच्या मोठमोठ्या नोकऱ्यांमध्ये लखपती-करोडपती, मोठमोठे जमिनदार आणि राजे-नवाबांचीच पोरं भरलेली आहेत. आय.सी.एस., आय.पी. एस., आय.एम.एस. मधल्या अधिकाऱ्यांच्या याद्या काढल्या तर दिसेल की देशातील धनिक, जमिनदार, सावकार आणि प्रभावशाली राजकारण्यांचीच पोरं भरलेली आहेत. बाप लखपती आहे, एका संस्थानाचा मंत्री आहे, आणि मुलगा सरकारी विभागाचा सेक्रेटरी. अखिल भारतीय सरकारेच नाही तर प्रांतांच्या सरकारांमध्येही त्यांनाच जागा मिळाली आहे, ज्यांच्यापैकी अधिकाशांकडे जगण्याचे इतर स्त्रोत उपलब्ध आहेत. जर सरकार चालवणारेच हे मोठ-मोठे कर्मचारी धनिक वर्गातून येतात, तर धनिक-गरिबाच्या मामल्यामध्ये ते आपल्या वर्गाच्या स्वार्थाविरोधात काम करतील असे होऊ शकते का? इंग्रज अधिकाऱ्यांच्या बाबतीत गेल्या दिडशे वर्षांचा अनुभव आहे की जिथे काळ्या-गोऱ्याचा सवाल असतो, तिथे ते न्यायाला खुंटीवर टांगून ठेवतात. कित्येक निरपराध भारतीय इंग्रजांच्या लाथांना आणि गोळ्यांना बळी पडले आहेत, पण किती खटल्यांमध्ये खून्याला फाशीची शिक्षा झाली आहे? साहेबाच्या लाथांनी मेलेल्या माणसाची प्लीहा डॉक्टरच्या तपासणीत वाढलेली दिसून आली. हाच न्यायाचा अभिनय आपण धनिक-गरिबांच्या मामल्यात न्यायाधिशाच्या पदावर बसलेल्या धनिकांच्या औलादींकडून होताना बघतो. जमिनदार आणि शेतकरी, कामगार आणि मिल-मालक यांच्या झगड्यामध्ये जो कटू अनुभव आपल्याला मिळत आहे, त्यातून दिसून येते की त्यांची सहानुभूती नेहमीच श्रीमंतांकडे असते. मारहाणीची आणि हल्ल्याची सर्वात जबरदस्त तयारी जमिनदारांची असते. आपली जीविका हिरावल्या जाण्याच्या भितीने शेतकरी शांततेच्या मार्गाने त्यांचा विरोध करतात. पण प्रत्येक जागी दिसून येते की पोलिस आणि मॅजिस्ट्रेट हे शेतकऱ्यांनाच दोषी ठरवतात आणि त्यांच्यावर कलम 107 वा कलम 144 ची कारवाई केली जाते. डोळ्यांना साफ दिसते की जमिनदारांनी हल्ला करण्यात कोणतीच कसर सोडली नाही, तरीही त्यांच्या एकाही माणसालाही काहीही बोलावे लागत नाही.

एका जागेचा आम्हाला ताजा अनुभव आहे की जमिनदारांनी पिढ्यानपिढ्या कसत आलेल्या शेतकऱ्यांकडून त्यांच्या जमिनी हिसकावू पाहिल्या. शेतकरी विचार करू लागले की जर जमिनीच गेल्या तर पोरंबाळं कशी जगणार? त्यांनी मार खाऊनसुद्धा जमिनी सोडल्या नाहीत. जमिनदारांनी पोलिस ठाण्यात तक्रार दिली. शेतकऱ्यांची तक्रार पोलिस लिहू इच्छितच नव्हते. ठाणेदाराने जमिनदाराच्या बाजूने काही शेतकऱ्यांवर शांतताभंगाचा आरोप लावला आणि मॅजिस्ट्रेटला कळवले. फौजदारी न्यायालयाने आपला निर्णय जमिनीच्या ताब्याला पाहून दिला पाहिजे. मॅजिस्ट्रेटला जमिनदाराचे ऐकून सत्य समजले. शेतकरी ओरडत बसले की येऊन बघा की शेतावर आमचा ताबा आहे. दोनशे-चारशे बिघ्यांची शेती करणारा माणूस एकराच्या चौथ्या-पाचव्या भागात वेगवेगळी शेती करणार नाही. पण मॅजिस्ट्रेटला तिथे जाण्याची गरज वाटली नाही. त्याने झटकन शेतकऱ्यांवर कलम 144 लावले. वरच्या अधिकाऱ्यानेही अनेकदा विनवण्या करुनही शेत पाहिलेच नाही, आणि मॅजिस्ट्रेटच्या निर्णयालाच कायम ठेवले. सगळीकडून न्यायाचा रस्ता बंद झालेला पाहून शेतकऱ्यांनी शांततामय सत्याग्रहाचा मार्ग अवलंबण्याचे ठरवले. दिवस ठरला. पोलिस आणि न्यायाधीशांना माहित होते की जमिनदाराच्या बाजूने जबरदस्त मारहाणीची तयारी चालू आहे. त्यांना हे सुद्धा माहित होते की शेतकरी कोणत्याही स्थितीत शांतच राहू इच्छितात. त्यांना हे सुद्धा माहित होते की जमिनदाराचे हत्ती या युध्दात भाग घेण्यासाठी विशेषरित्या प्रशिक्षित केले जात आहेत. ठरलेल्या दिवशी हत्तींसोबतच शेकडो माणसं लाठ्या-कुऱ्हाडी घेऊन एकत्र झाली. शेतकऱ्यांच्या बाजूने फक्त काही नि:शस्त्र सत्याग्रही. जनतेला विशेषत: मोठ्या संख्येने न येण्यास कळवले गेले होते. शेतकरी फक्त अकरा शेतांच्या दिशेने वळले. हत्ती आणि लाठीधारी जवान घेऊन जमिनदार सत्याग्रहींवर हल्ला करायला शेतावर पोहोचतो. पोलिसांच्या संख्येबद्दल माहित नाही. अटकेनंतर जेव्हा सत्याग्रही पोलिसांच्या ताब्यात होते, तेव्हा जमिनदाराच्या एका माणसाने एका सत्याग्रहीवर लाठी चालवली. डोक्यातून रक्ताची धार वाहू लागली. लाठी मारणाऱ्याला तर तेव्हा अटक केली गेली, पण थोड्याच वेळाने सरकारी अधिकाऱ्यांनी त्याला सोडून दिले. आंधळासुध्दा सांगू शकला असता की मारहाणीची सगळी तयारी जमिनदाराच्या बाजूने झाली होती. पण त्याच्या एकाही माणसाला ना पकडले गेले ना थांबवले गेले. त्यांच्या लाठीधारकांना कायदा हातात घेण्यासाठी मोकळे सोडले गेले.

एका दुसऱ्या जमिनदाराचा किस्सा आहे जो सांगतो की धनिकांसमोर न्याय आणि कायद्याची काय दुर्दशा आहे. त्यांची इच्छाच नाहीये की शेतकऱ्यांना शेतांमध्ये काश्तकारीचा अधिकार मिळावा. अनेक दिवसांपासून शेतकरी शेत कसत आलेत. सर्व्हे मध्ये लाख प्रयत्न करूनही काश्तकारी लागू झालीच. जमिनदाराने खटल्याची आणि जोर-जबरदस्तीची तयारी केली. शेतकऱ्यांना माहित होते की एवढ्या मोठ्या जमिनदाराशी लढले तर उध्वस्त होतील, त्यामुळे बहुतांशांनी जाऊन आपल्या राजीनाम्याला नोंदणीकृत केले. मी ढिगाढिगाने त्या नोंदणीकृत राजीनाम्यांना पाहिले आहे आणि पाहताना मी विचार करत होतो की गरिबांसाठी न्यायाचा काय अर्थ आहे? जर न्याय मिळवण्याचा त्यांना थोडाही भरवसा असता तर त्यांनी स्वत:च्या आणि आपल्या मुलाबाळांच्या जीविकेच्या साधनांचा राजीनामा का दिला असता?

जुगाराला कायद्या विरोधात समजले जाते. पण घोड्यांची रेस काय आहे? त्यामध्ये राजाचे सुद्धा घोडे सामील असतात, त्यामुळे घोड्यांच्या रेसचा जुगार पवित्र आहे. आणि मोठमोठ्या लॉटऱ्या जुगार नाही का? मोठमोठे जुगार तर पोलिसांच्या रक्षणामध्ये नियमित चालतात. मोठमोठ्या जुगारांच्या रक्षणाचा भार तर सत्तेच्या सूत्रधारांच्या खांद्यावर आहे. हाच न्याय आहे? आश्चर्य !

अनुवाद: अभिजित

# मोदी सरकारचे नवीन चार कामगार कायदे !

पान 5 वरून

वर्गावरील हल्ले सतत वाढतच गेले आहेत. कॉंग्रेस-भाजप च्या नेतृत्वाखालील सर्वच सरकारांनी क्रमाक्रमाने कामगार अधिकार काढून घेण्याचेच काम केले आहे. यापैकी सर्वात मोठा हल्ला आता या नवीन 4 कायद्यांद्वारे केला जात आहे. देशामधील आर्थिक संकट जसजसे वाढत आहे, मालकांच्या नफ्याची काळजी वाहणाऱ्या भांडवली सरकारांकडून कामगार वर्गावरील हल्ला अधिकाधिक तीव्र केला जात आहे. मालकांच्या नफ्याच्या दराची खात्री कामगारांच्या रक्ता-घामातून देण्यासाठीच कामगार कायद्यांमध्ये हे बदल केले जात आहेत.


देशातील कामगार चळवळ आज भांडवलधार्जिण्या दुरुस्तीवादी नकली डाव्या पक्षांनी मोडकळीस आणली आहे. लाखोंच्या सदस्यसंख्या असलेल्या युनियन्स चालवणारे हे पक्ष आज फक्त दिखाव्याच्या आंदोलनांपलीकडे काहीच करू पहात नाहीत कारण कामगारवर्गीय क्रांतिकारी विचारांशी त्यांचा कधीच विच्छेद झालेला आहे. यापलीकडे देशातील 93 टक्के असंघटित कामगारांपर्यंत तर त्यांची पोहोचच नाही. आज आवश्यकता आहे की बहुसंख्यांक कामगार वर्गाला एकत्र करणाऱ्या, ठेकेदारी कामगार, सर्व प्रकारचे असंघटित कामगार यांच्या औद्योगिक सेक्टरनिहाय आणि भौगोलिक क्षेत्रनिहाय व्यापक युनियन्स संघटित केल्या जाव्यात आणि योग्य क्रांतिकारी राजकीय विचारांच्या आधारावर एका नव्या क्रांतिकारी कामगार चळवळीचा पाया घातला जावा. हा रस्ता प्रदीर्घ नक्कीच आहे, परंतु दुसरा रस्ता नाही. अशी कामगार वर्गीय चळवळच आज भांडवलदार वर्गाची सेवा करणाऱ्या भाजप-आर.एस.एस. प्रणित फॅसिस्ट आंदोलनाला खऱ्या अर्थाने टक्कर देऊ शकते.

# पुण्यात 8 मार्च महिला दिनानिमित्त अभिवादन फेरी

पान 3 वरून

लढाऊ महिलांनी देशात स्त्री मुक्तीच्या लढ्याची रूजवात केली. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवत आपणही सद्यस्थितीत स्त्री मुक्तीचे ध्येय घेऊन आजच्या कार्यभारांसाठी लढू हा निर्धार सर्वांच्या मनात होता.

यावेळी महाराष्ट्र बांधकाम कामगार युनियनच्या महिला व **पुरुष साथीदारांनीही आपला सहभाग नोंदवला. संपूर्ण कामगार वर्गाची मुक्ती ही अर्धी संख्या असलेल्या स्त्री कामगारवर्ग मुक्तिशिवाय शक्य नाही,** तेव्हा स्त्रियांच्या मुक्तीच्या लढ्याला स्त्रियांपुरते मर्यादित न ठेवता त्यांसोबतच पुरुष साथींनीही लढणे किती गरजेचं आहे याचे महत्त्व सांगत पुरुषांना फेरीत सहभागी होण्यास आवाहन केले. विशेषकरून 2014 नंतर मोदी सरकार सत्तेत आल्यावर फॅसिस्ट गुंड शक्तींचा उभार, जातीयवादी दंगली, पितृसत्ताक रुढी, परंपरा, मुलींवर दिवसागणिक वाढते अत्याचार ही आव्हानं वाढली आहेत, तेव्हा त्यांना तोंड देण्यासाठी सर्व घरकामगार महिलांनी एकत्र येऊन याविरुद्ध संघर्ष उभा करण्याचे ठाम मत दर्शवले. कामगार चळवळीतील गाणी आणि त्या लढ्यांचा इतिहास सांगणारी भाषणे झाल्यावर जोरदार घोषणांनी कार्यक्रमाची सांगता झाली.



# तुमच्या सदाचाराचा ऱ्हास

✍ राहुल सांकृत्यायन

## तुमच्या न्यायाचा ऱ्हास

न्याय करण्याचे ढोल तर पूर्वापारपासून वाजवले जात आलेत. समाज आणि त्याचे नेतृत्व करणाऱ्या धनिकांकडून गरिबांवर किती अन्याय होतो, याबद्दल तर आम्ही बोललोच आहोत! जगातील सरकारं न्याय किती देताहेत, जरा बघूयात. आजकालची सरकारं कोर्ट आणि कायदे बनवण्यावर बरेच लक्ष देतात आणि म्हटले जाते की हे सगळे याकरिता की सर्वांना न्याय मिळणे सोपे जावे. पण गरिबांना खरंच न्याय मिळवणे सोपे आहे का? ज्याकाळी कोर्ट नव्हती, फक्त पंचायती होत्या; ज्यावेळी कायदे नव्हते, फक्त व्यवहार बुद्धी होती, ज्यावेळी वकील नव्हते, प्रत्येक व्यक्ती स्वत:च वकील होता - त्या काळी गरिबांना न्याय मिळवणे अधिक सोपे होते! कायद्यांमुळे तर न्याय समजणे सोपे नाही, उलट प्रचंड गोंधळवणारे काम झाले आहे आणि कायद्यांमुळे तर स्पष्ट गोष्टी सुद्धा अस्पष्ट होतात. म्हणायला तर असेही म्हटले जाते की कायदा हा व्यवहार बुद्धीवर म्हणजे कॉमन सेन्सवर अवलंबून आहे. परंतु आजकाल तर त्याचे काम व्यवहार बुद्धीला निकामी बनवणेच राहिले आहे. इवल्याशा प्रतिभा ज्या समाज हिताचे काम करू शकल्या असत्या, त्या आज शब्दांचे किस काढत कायद्याच्या अर्थाचा अनर्थ करायला तत्पर आहेत. खोट्या खटल्याला खरे, आणि खऱ्याला खोटे करण्यालाच चांगली वकिली मानले जाते. दररोज, दिवसाढवळ्या आपण पांढऱ्याचे काळे आणि काळ्याचे पांढरे होताना पहातो.

कायदा आणि न्यायालय हे धनिकाच्या विरोधात, गरिबाला न्याय देण्यात किती असमर्थ आहेत, हे समजायला दृष्टांताची गरज नाही. भारताच्या प्रत्येक गावात याची अनेक उदाहरणे मिळतील. छोट्या अपराधांची तर गोष्टच सोडा, खून सुद्धा पचवले जातात. जमिनदार किंवा धनिकाच्या इशाऱ्यावर एक माणूस मारला गेला. धनिक माणसाने नोटांचा गठ्ठाच डॉक्टरसमोर ठेवला. डॉक्टर तर समजतोच, की दहा वर्षात जितके कमावता येईल तितके समोर ठेवले आहे, आणि घरी आलेल्या लक्ष्मीला नाकारायचे नसते. डॉक्टर लिहून देतो—हृदय कमजोर होते, घाव हलका होता, इत्यादी आणि मामला रूपच पालटतो. अनेकदा तर प्रेताला लगेचच जाळून टाकले जाते आणि नंतर धमक्या व प्रलोभनांचा वापर करून साक्षिदारांना आपल्या बाजूला वळवले जाते. अनेकदा गरिब लोक तर कोर्टापर्यंत जातच नाहीत. जर धनिकाद्वारे केलेले तीन खून एखाद्या ठाणेदाराला मिळाले तर त्याचे तर नशिबच फळफळते. तो एवढा पैसा कमावतो की नोकरी गेली तरी आयुष्यभर चैनीत काढेल.

बिहारच्या एका मोठ्या जमिनदाराची गोष्ट आहे. त्यांना लाखांचे उत्पन्न आहे, जे त्यांच्या बापाने त्यांच्यासाठी एका नकली बिलाचा वापर करून मिळवले होते. त्या वेळी ते एकदम तरुण होते. एक स्वजातीय गरिब मुलगा त्यांच्याजवळ रहात होता. एका दिवशी कशामुळे तरी नाराज होऊन तरुण जमिनदाराने त्या मुलाला गोळीच घातली. मुलगा तिथेच खलास झाला. मृतदेह जाळून टाकला आणि पोलिस ठाण्याच्या फौजदाराला बोलावून एक मोठी रक्कम त्याला पेश केली. पैसे पाहून तर फौजदाराचे तर डोळेच चमकू लागले. कधीकाळी हेच फौजदार असहयोग आंदोलनात नोकरीचा राजीनामा देऊन राष्ट्रीय युद्धात सामील झाले होते. अनेक वर्ष आम्ही दोघे सोबत काम करत होतो. त्यांनीच सांगितले की कसे भरराली त्यांनी मृत मुलाच्या बापाच्या गावात जाऊन त्याच्या संबंधितांची दिशाभूल केली. कशाप्रकारे वरपासून खालपर्यंत अधिकाऱ्यांना पैसे वाटून कायदा आणि न्यायाला मूर्ख बनवले. खून झाल्याची बातमी सुद्धा कोर्टापर्यंत पोहोचली नाही. ज्या



तरुणाने आपल्या सोबत खेळणाऱ्या मुलाला अशाप्रकारे गोळी घातली, तो सामान्य मेंदूचा व्यक्ती असू शकत नाही. जर तो गरिब घरात जन्माला आला असता, तर खून केल्यावर फाशीपासून वाचला असता तरी आयुष्यभर त्याला मोठमोठ्या तुरुंगांमध्ये जन्मजात अपराध्यांसोबत रहावे लागले असते. पण हा माणूस तर प्रांतामधील मोठ्या प्रभावशाली धनिक पुढाऱ्यांपैकी एक बनला आहे.

एका दुसऱ्या धनिक जमिनदाराची गोष्ट आहे. आपल्या रुबाबासाठी ते आजूबाजूच्या गावांमध्ये मोठे प्रसिद्ध होते. म्हणायला तर हिंदुस्तानात इंग्रजांचे राज्य आहे, पण जोपर्यंत जमिनदारीचा संबंध आहे, इंग्रजी शासनाचा नंबर नंतरच येतो. छोट्यामोठ्या मारहाणी तर सोडाच, मोठमोठा खटल्यांचे निर्णय सुद्धा हा व्यक्ती दंड लावून करायचा, आणि कोणाची हिंमत नव्हती की त्याच्या निर्णयाच्या विरोधात पोलिस ठाण्यापर्यंत जाईल. त्यांच्या गावात एका माणसाने मैना पाळली होती. मैना माणसासारखं बोलायची. जमिनदार साहेबाला गोष्ट समजली. लगेच मैना मागवायला माणूस पाठवला. गरिबाने जगाच्या अनुभवातून जास्त शिकले नव्हते. आपल्या प्रिय पाळलेल्या पश-पक्षावर माणसाचा मुलासारखा जीव जडतो. याच प्रेमापोटी आंधळा होऊन त्या गरिबाने मैना देऊ केली नाही. जमिनदाराला कळले तर त्याचा तिळपापड झाला. त्याने लगेचच एका पैलवान शिपायाला पाठवले की त्या गरिबाला मारून मैना घेऊन ये. खरोखर गरिबाला जिवानिशी मारून मैना पकडून आणली. खटला कोर्टात तर गेला, पण जमिनदाराला एक दिवस सुध्दा जेल मध्ये जावे लागले नाही.

मगध प्रांतातील पटना-गया जिल्हे जमिनदारांच्या अत्याचारासाठी सगळ्या बिहार मध्ये प्रसिद्ध आहेत. तिथल्या एका जमिनदाराचा संकल्प होता की काहीही झाले तरी त्यांच्या जमिनदारीमध्ये कोणत्याही शेतकऱ्याचे नाव काश्तकार म्हणून लागता कामा नये. आपल्या प्रत्येक गावात त्यांनी खोटे खटले भरून, मारहाणी करून, आणि इतर मार्गांनी लोकांना त्रस्त करून त्यांना काश्तकारीतून राजीनामा द्यायला भाग पाडले. त्यांच्या एका गावातील—ज्याचे नाव आता दूरवर पसरले आहे—जवळपास सगळेच शेतकरी आता काश्तकारी गमावून त्यांचे पोटभाडेकरू शेतकरी बनले आहेत. त्या गावात एका शेतकऱ्याचे घर होते ज्याच्याकडे खाण्यापिण्यासाठी बरेचसे शेत आणि पैसा होता आणि कुटुंबातील काम करणारे अनेक व्यक्ती तरुणही होते. जमिनदाराला या घराला हरवण्यात अनेकदा अपयश आले. यावर त्याने प्रतिज्ञा घेतली की त्या कुटुंबाला बर्बाद करून त्यांच्या घरावर एरंडाची पेरणी केली नाही तर नाव लावणार नाही. यावेळी तर त्यानं दुसऱ्या गावातील एका मरणासन्न व्यक्तीला आणून गावात मरू दिले आणि त्या कुटुंबातील व्यक्तींवर खुनाचा खटला लावला. डॉक्टरने रिपोर्ट दिला की जाणूनबुजून धडधाकट व्यक्तीचा खून केला गेला आहे. पोलिसांनी 'प्रत्यक्षदर्शी' साक्षीदारांच्या साक्षी नोंदवल्या. घरातील सगळेच जाणते पुरुष तुरुंगात टाकले गेले. खटला लढण्यात घरातील सगळा पैसा संपला. पुरुषांना दीर्घ मुदतीच्या कैदेच्या शिक्षा झाल्या. घरात फक्त स्त्रियाच शिल्लक राहिल्या ज्यापैकी अनेक काही वर्षांमध्येच भुकेने आणि आजारानी मेल्या. घर बिना डागडुगीचे पडून राहिले आणि त्यावर पेरलेल्या एरंडाला सुद्धा मी खुद्द माझ्या डोळ्यांनी पाहिले.

तरी ही आहे आजच्या कायद्याची करामात आणि आजच्या कायद्याचा नमुना.

न्याय स्वस्त आणि सुलभ तर नाहीच, उलट बलाढ्य शत्रू विरोधात तो जगातील सर्वाधिक महागडी गोष्ट आहे. न्याय इतका खर्चिक मामला आहे की धनिक माणूस हारता-हारता सुद्धा गरिबाला नेस्तनाबूत करतो. स्टँपचा पैसा दिल्याशिवाय तर गरिब माणूस कोर्टात अर्ज सुद्धा देऊ शकत नाही. आणि मग स्टँप तर पुरेसा नाहीच. यानंतर पाहिजे वकिलाची आणि मुखत्याराची फी, पेशकार (वाचनिक, प्रपाठक-अनुवादक) आणि सरिस्तेदाराला नजराणे, ऑर्डरली आणि शिपायाला भेटवस्तू. बलाढ्य प्रतिस्पर्धी मोठ्या वकिलाला तगडी फी देऊन कामाला लावतो. जर तुम्ही एखाद्या चिरकुट वकिलाला उभे केले तर चांगला बाजूचा असलेला खटला सुद्धा फिरण्याची शक्यता असते. घर विका, जमिन विका, दागिने गहाण ठेवा, कसेही करून पैसे खर्च करून खटला चालू ठेवा. जर खटला दिवाणी असेल आणि एकच असेल तरी फौजदारी खटल्यांच्या संख्येवर तर बंधन नसते. मारहाण, गुरे चारणे सारखे अनेक खटले तर एकाचवेळी फौजदारी कोर्टात चालूच शकतात. खालच्या कोर्टात (मुन्सिफ) कडे निर्णय बाजूने लागला, तरी वरच्या कोर्टात (सब-जज कडे) अपील होईल. तिथेही जर नशिबाने साथ दिली तर हायकोर्ट आणि यानंतर प्रिव्ही कौन्सिल (हा लेख लिहिला गेला, तेव्हा इंग्रजांच्या राज्यात सुप्रिम कोर्ट नव्हते - अनुवादक). फौजदारी खटले तर वेगळे चालूच राहतील. जर प्रत्येक टप्प्यावर खर्च करायला तुमच्याकडे पैसे नसतील तर जीत हारमध्ये सुद्धा बदलू शकते.

हे तर तेव्हा जेव्हा न्यायाधीश इमानदार असतील, पण आजकाल न्यायाधीशांपैकी सुद्धा किती आहेत जे लगेच श्रीमंत बनू इच्छित नाहीत? ज्यांना अडीचशे रुपये महिना पगार मिळतो, त्याची पण इच्छा आहे की त्याच्याकडे मोटर-कार असावी, त्याचीही इच्छा आहे की त्याने आणि त्याच्या बायकोने शाही थाटात रहावे, त्याच्या मुला-मुलींना राजपुत्र-राजपुत्रींना ऐश करता यावी, त्यांच्या महालाला राजमहालाची शान यावी, सणसणावारांना उधळपट्टी करून आपली श्रीमंती सिद्ध करता यावी, मुलांना शिकवायला महागातल्या महाग शाळा-कॉलेजांचा शोध घेता यावा; लग्नसमारंभामध्ये मोठमोठे आहेर हुंड्यामध्ये देता यावेत आणि दोन्ही हातांनी पैसे उधळावेत; त्यांच्या पार्टी मध्ये मोठमोठे न्यायाधिश आणि श्रीमंत यावेत आणि देशी-विदेशी सर्व प्रकारची उत्तमोत्तम व्यंजनं बनवली जावीत. आपल्या आजकालाच्या न्यायाधीशांच्या जर या हार्दिक लालसा असतील तर पैशांचा छमछमाट त्यांना आकर्षित का नाही

पान 10 वर

### लेखकाचा परिचय

राहुल सांकृत्यायन (1893-1963) खऱ्या अर्थाने जनतेचे लेखक होते. ते आजच्यासारख्या तथाकथित प्रगतिशील लेखकांसारखे नव्हते, जे जनतेच्या जीवन आणि संघर्षापासून अलिप्त राहून आपापल्या महालांमध्ये बसून कागदावर प्रकाश टाकत असतात. जनतेच्या संघर्षाचे मोर्चे असोत वा सरंजामदार-जमीनदारांच्या शोषण-दमनाच्या विरूद्ध शेतकऱ्यांच्या संघर्षाचा लढा असो, ते नेहमीच पहिल्या फळीत उभे राहिले. अनेक वेळा तुरूंगात गेले, यातना सहन केल्या. जमीनदारांच्या भाडोत्री गुंडांनी त्यांच्यावर प्राणघातक हल्लासुद्धा केला, परंतु स्वातंत्र्य, समानता आणि मानवी स्वाभिमानासाठी ते ना कधी संघर्षातून मागे हटले आणि ना कधी त्यांची लेखणी थांबली.

जगभरातील 26 भाषा अवगत असलेल्या राहुल सांकृत्यायन यांच्या अचाट बुद्धीचे अनुमान यावरूनसुद्धा लावता येऊ शकते की, ज्ञान-विज्ञानाच्या अनेक शाखा, साहित्याच्या अनेक प्रकारांमध्ये त्यांनी हातोटी मिळवली होती. इतिहास, तत्वज्ञान, पुरातत्वशास्त्र, मानववंशशास्त्र, साहित्य, भाषा-विज्ञान इ. विषयांवर त्यांनी अधिकारवाणीने लेखन केले. बौद्धिक गुलामी, तुमचे अध:पतन, पळू नका-जगाला बदला, तत्वज्ञान-संदर्भ, मानवसमाज, वैज्ञानिक भौतिकवाद, जय यौधेय, सिंह सेनापती, साम्यवादच का?, बावीसावे शतक इ. रचना त्यांच्या महान प्रतिभेची ओळख स्वत:हूनच करून देतात.

राहुल देशातील दलित-शोषित जनतेला हर-तऱ्हेच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी लेखणीचा हत्यारासारखा वापर करायचे. त्यांचं म्हणणं होतं की, "साहित्यकार जनतेचा जबरदस्त सहकारी, सोबतच तो त्यांचा नेता (पुढारी) आहे. तो सैनिक आहे आणि सेनापतीसुद्धा."

राहुल सांकृत्यायन यांच्यासाठी जीवनाचं दुसरं नाव गती होतं आणि मरण किंवा स्तब्धतेचं दुसरं नाव होतं साचलेपणा. यामुळेच अगोदरच तयार असलेल्या मार्गावर चालणे त्यांना कधीही आवडले नाही. ते नव्या मार्गाचे संशोधक होते. परंतु फिरणे म्हणजे त्यांच्यासाठी फक्त भूगोलाची ओळख करून घेणे नव्हते. ते सुदूर देशांतील जनतेचं जीवन आणि त्यांच्या संस्कृतीशी, त्यांच्या जिजीविषेशी ओळख करून घेण्यासाठीचं फिरणं होतं.

समाजाला मागे ढकलणाऱ्या हरतऱ्हेच्या विचार, रूढी, मूल्ये, मान्यता-परंपरांच्या विरूद्ध त्यांचे मन अतिशय तिरस्काराने भरलेले होते. त्यांचं संपूर्ण जीवन आणि लिखाण याविरूद्ध विद्रोहाचं जितं-जागतं उदाहरण आहे. यामुळेच त्यांना महाविद्रोहीसुद्धा म्हटले जाते. राहूल यांची ही वेगळी रचना आजसुद्धा आपल्या समाजातील प्रचलित रूढी-परंपरांच्या विरूद्ध तडजोड विहीन संघर्षाची आरोळी आहे.

# हरियाणामध्ये स्थानिकांना नोकरीत आरक्षणाचा कायदा

## कामगार वर्गामध्ये फूट पाडण्याचे कारस्थान ओळखा! कामगार वर्ग प्रांतीय, जातीय, धार्मिक भेद मानत नाही!

✍ राहुल

हरियाणा राज्यातील भारतीय जनता पक्षाच्या सरकारने मार्च महिन्यात स्थानिकांना नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्याचा कायदा बनवला आहे. यानुसार खाजगी क्षेत्रातील 50 हजार रुपये पर्यंत पगार असलेल्या नोकऱ्यांमध्ये 75 टक्के नोकऱ्या स्थानिक लोकांसाठी आरक्षित करण्याचा निर्णय झाला आहे. महाराष्ट्रामध्ये सुद्धा अशाप्रकारचा कायदा प्रस्तावित आहे ज्याद्वारे खाजगी क्षेत्रातील 80 टक्के नोकऱ्या स्थानिकांसाठी आरक्षित करण्याचा इरादा शिवसेना-राष्ट्रवादी-काँग्रेसच्या महाविकास आघाडी सरकारने जाहीर केला आहे. देशभरामध्ये या अगोदर झारखंड, गुजरात, आंध्र प्रदेश, तामिळनाडू, उत्तराखंड सहीत अनेक राज्यांमध्ये असे कायदे बनले आहेत व बनण्याचे सुतोवाच झाले आहे.

महाराष्ट्रामध्ये भूमीपुत्राच्या नावाचे राजकारण करत शिवसेनेसारखे पक्ष उभे झाले. मनसे आणि राष्ट्रवादी सारखे पक्षही यामध्ये मागे राहिलेले नाहीत. कामगार वर्गाच्या एका हिश्श्यामध्ये बिहारी, 'भैय्ये' लोक यांच्याविरोधात घृणेचे, तिरस्काराचे वातावरण तयार करण्यात काही प्रमाणात हे पक्ष यशस्वी सुध्दा राहिले आहेत. 'बाहेरचे' लोक येऊन आमच्या नोकऱ्या घेतात, बाहेरच्या लोकांमुळे कमी मजुरीत काम करावे लागते, अशा तक्रारी कामगार वर्गाच्या एका हिश्श्याकडूनही येतात. अशामध्ये हरियाणात पास झालेल्या या कायद्याच्या निमित्ताने कामगार वर्गाने हे ओळखणे आवश्यक आहे की 'स्थानिक' आणि 'बाहेरचे' कामगार अशा प्रकारचा कोणताही भेद हा कामगार वर्गाच्या हिताच्या विरोधातला भेद आहे, आणि याप्रकारचे आरक्षणाचे कायदे फक्त मालकवर्गाचे हित साधणारे आहेत.


या कायद्यांचा फोलपणा आणि त्यामागील षडयंत्र समजून घ्यायचा असेल तर काही मूलभूत गोष्टी अगोदर समजणे आवश्यक आहे.

### बेरोजगारी सर्वव्यापी आहे

देशामध्ये प्रचंड बेरोजगारी आहे. कोरोना लॉकडाऊन नंतर तर 25 टक्क्यांच्या आसपास बेरोजगारी दर पोहोचला आहे. शिकलेले आणि न शिकलेले, कमी शिकलेले आणि जास्त शिकलेले, पुरूष आणि महिला, युवक आणि ज्येष्ठ अशा सर्वांनाच बेरोजगारीचा सामना करावा लागत आहे. पी.एच.डी. सारखे सर्वोच्च शिक्षण झालेले लोक आत्ता शिपायाच्या नोकरीसाठी रांगा लावत आहेत. पदवी शिक्षण घेतलेले लोक आता मजूर अड्ड्यांवर येऊन बिगारी काम शोधत आहेत. देश स्वतंत्र झाल्यापासून बेरोजगारी नेहमीच अस्तित्वात राहिलेली आहे! भांडवलदारांची अभूतपूर्व सेवा करणारे मोदी सरकार सत्तेत आल्यानंतर मात्र नोटबंदी, जीएसटी, नवीन कामगार कायदे, आततायी लॉकडाऊन सारख्या पावलांमुळे बेरोजगारी प्रचंड वाढली आहे.

### बेरोजगारीचे कारण भांडवली व्यवस्था आहे, 'बाहेरचे' लोक नाहीत

काम कोण देतं? ज्याच्याकडे 'उत्पादन साधनांची' म्हणजे कारखाने, खाणी, रस्ते, वाहने, शेतं, यंत्र, इंधन, इत्यादींची मालकी आहे तोच काम देऊ शकतो. आज भारतात या सर्वांवर मालकी कोणाची आहे - मूठभरांची ज्यांना आपण 'भांडवलदार' म्हणतो. हे भांडवलदार कारखाने काढतात, मोठमोठ्या शेतांवर मजूर लावून शेती करवतात ते तुम्हा-आम्हाला नोकऱ्या देण्यासाठी? अजिबात नाही. हे सर्व चालते ते नफ्यासाठी. नफा कुठून येतो? सर्व संपत्तीची निर्मिती मेहनत करणारे कामगार करतात. या संपत्तीचाच एक खूप छोटा वाटा मजुरांना मजुरी म्हणून मिळतो आणि मोठा वाटा म्हणजेच 'नफा' मालकाच्या खिशात जातो. माल बाजारात विकून पैशाच्या रूपाने नफा हातात येतो, पण मालच्या रूपात तर तो मजुरांनी अगोदरच पैदा करून मालकाच्या हातात दिलेला असतो. तेव्हा नफा बाजारात खरेदी-विक्रीतून नाही, तर कामगारांच्या श्रमशक्तीतूनच पैदा होतो!



कामगार जितके जास्त काम करतील आणि जितक्या कमी मजुरीत काम करतील तितका मालकांचा नफा जास्त! जितके कमी कामगार काम करतील तितका मालकाचा नफा जास्त! जितकी जास्त बेरोजगारी असेल तितकी कामगारांमध्ये स्पर्धा जास्त असेल आणि ते तितका त्यांच्यावर कमी मजुरीत काम करण्याचा दबाव असेल. **तेव्हा भांडवलदार मालकांचे हित बेरोजगारी टिकवण्यामध्ये आहे हे निर्विवाद सत्य आहे! जोपर्यंत मूठभरांच्या ताब्यात उत्पादनाची साधने आहेत, बाजाराची, नफ्याची, खरेदी-विक्रीची व्यवस्था आहे, भांडवलदार-कामगार हे नाते अस्तित्वात आहे तोपर्यंत बेरोजगारी राहणारच आहे!**

आरक्षणामुळे नवीन नोकऱ्या पैदा होत नाहीत! असलेल्या नोकऱ्यांची वाटणी फक्त बदलते! जिथे कोट्यवधी बेरोजगार आहेत, तिथे काही हजार नोकऱ्यांमध्ये आरक्षण दिल्याने कोणाला काय मिळणार आहे? तेव्हा हे आरक्षणाचे गाजर फक्त जनतेचा असंतोष भरकटवण्यासाठी आहे हे समजले पाहिजे.

### विकासाची विषमता ही 'भांडवली' व्यवस्थेत राहणारच आहे

आज आपल्याला दिसते की महाराष्ट्रातच मुंबई, पुणे, नाशिक सारख्या शहरांचा तुलनेने जास्त औद्योगिक 'विकास' झालेला आहे. इतकेच नाही तर भारताच्या स्तरावर पाहिले तर तुलनेने महाराष्ट्र, तामिळनाडू, पंजाब सारख्या राज्यांचा विकास जास्त झालेला आहे. यापुढे जाऊन जगाच्या स्तरावर इंग्लंड, अमेरिकेसारखे देश औद्योगिक विकासात पुढे आहेत. असे का? याचे कारण सोपे आहे. भांडवलदार मालकांना जास्त नफा पाहिजे, त्यासाठी ते कारखाने तिथेच लावतात जिथे मजूर स्वस्त मिळतात, वा कच्चा माल स्वस्त मिळतो, वा दळणवळण, बाजाराची उपलब्धता इतर कारणांमुळे नफा वाढणे शक्य असते. मुंबई, पुण्यासारख्या शहरांमध्ये उद्योग केंद्रीत होत जातात कारण त्यामुळे खर्च कमी होतो. थोडक्यात असमान विकास हा भांडवलशाहीमध्ये होणारच आहे.

तेव्हा मराठवाडा, विदर्भ असो किंवा देशाच्या स्तरावर बिहार, उत्तरप्रदेश असो येथील लोकांचा काहीच दोष नाही की त्यांच्याकडे रोजगार नाही. भांडवली व्यवस्था जी पुण्या-मुंबईतील कामगारांना आज 8-10 हजार सुद्धा मजुरी मिळू देत नाही, तीच बेरोजगारी पैदा करत आहे.

भारतात तर एक टक्के लोक राज्य सोडतात, अमेरिकेमध्ये 10 टक्के लोक राज्य सोडतात, ब्राझील मध्ये 3.5 टक्के लोक आपले राज्य सोडतात. अनेक भारतीय परदेशातही नोकऱ्या शोधत जातात. अमेरिकेतही आता बाहेरच्या लोकांविरोधात वातावरण तापवण्याचे राजकारण डोनाल्ड ट्रंपसारख्यांनी केले आहे. हे लक्षात घ्या की कामासाठी घर, जागा, जिल्हा, राज्य इतकेच नाही तर देश सोडणे हे सतत होत आले आहे आणि जगभर होत आहे. याचे कारण असमान विकास, भांडवलदारांनी चालवलेल्या अर्थव्यवस्थेमध्ये आहे.

### प्रवासी कामगार बाहेरच्या राज्यातील नाहीत, तर त्याच राज्यातले सर्वाधिक आहेत !

अनेक राज्यांमधील कामगारांमध्ये हा भ्रम आहे की 'बाहेरच्या' राज्यातील कामगार येऊन नोकऱ्या घेतात. धंदेबाज, दलाल राजकीय पक्षांनी हे भ्रम व्यापक प्रचारातून पैदा केलेत. वास्तव काय आहे? पुण्या-मुंबईसारख्या शहरांमध्ये जे कामगार विस्थापित होऊन येतात, त्यापैकी **85 टक्के लोक हे महाराष्ट्राच्याच इतर जिल्ह्यांमधून स्थानांतरीत आहेत!** हा लेख वाचणाऱ्या कामगारांनी सुद्धा स्वतःलाच विचारावे की तुम्ही किंवा तुमच्या आजुबाजूला असलेल्या मराठी कामगारांपैकीच किती जण 'भूमीपुत्र' आहेत आणि किती नाईलाजाने आपल्या गावाखेड्यांना सोडून शहरांकडे मोलमजुरी करायला आले आहेत!

पुढे प्रश्न विचारा. तुम्ही मराठी म्हणून कोणी मराठी ठेकेदार तुम्हाला जास्त मजुरी देतो का, जास्त सुट्ट्या, कामाचे कमी तास देतो का? गुजरात मध्ये एखादा गुजराती ठेकेदार असे करतो का? बाहेरचे हा शब्द प्रयोग कामगारांच्या बाबतीतच का केला जातो? लक्षात घ्या की कामगारांचे शोषण करण्यात मालक वर्ग एक आहे, आणि कामगारांनी एक होऊ नये हे त्याचे उद्दिष्ट आहे. तेव्हा 'बाहेरचे', 'परके', 'परप्रांतीय' या शब्दांपासून सावध! हे शब्द कामगारांमध्ये फक्त फूट पाडण्याचे काम करतात.

### भांडवली पक्षांचे राजकारण ओळखा! कामगार वर्गीय राजकारणाची कास धरा!

शिवसेना हा पक्ष साठच्या दशकात काँग्रेस सरकारच्या पाठिंब्याने जन्माला आला आणि वाढला. जेव्हा मुंबईत कामगार चळवळ अत्यंत मजबूत होती, तेव्हा कापड मील मालकांनी आपल्या विश्वासू काँग्रेस पक्षामार्फत शिवसेनेसारख्या गुंड संघटनेला उभे राहू दिले. 'हटाओ लुंगी, बजाओ पुंगी' अशी अत्यंत बिभत्स घोषणा दक्षिण भारतीय कामगारांच्या विरोधात देत कामगार वर्गात फूट पाडण्याचे काम त्यांनी केले. जेव्हा या घोषणेचा प्रभाव संपला, तेव्हा त्यांनी हिंदू-मुस्लिम आणि नंतर बिहारी-युपी वाल्यांच्या विरोधात हिंसा करवण्याचे काम केले. आता यांना 'धर्मनिरपेक्षतेचा' पुळका आलाय. यांच्यातूनच फुटून निघालेल्या मनसेचे राज ठाकरे यानी तर एका मुलाखतीत जाहीर सांगितले की पक्षाने भांडवलदारांची कामे केली तर ते पैसा देतात पक्षाला! या दोघांचे बोलवते धनी काँग्रेस-राष्ट्रवादी मध्ये आहेत हे सत्य लपलेले नाहीच.

आता हरियाणामध्ये कायदा केलाय तो भारतीय जनता पक्षाने, जो इतर भारतामध्ये अशा मुद्यांवर अनेकदा विरोधाची आणि कधी गप्प बसण्याची भुमिका घेत आला आहे. हरियाणामध्ये बेरोजगारीचा दर 33 टक्क्यांवर पोहोचलेला आहे. म्हणजे सरकारी पद्धतीने मोजणी केल्यावर दिसून आले आहे की तीनपैकी एका माणसाला काम नाहीये. **जर कामच नाहीये तर आरक्षणाची संधी पैदा करून काम पैदा होणार नाहीये!**

तेव्हा हे सर्व धंदेबाज, भांडवलदारांची सेवा करणारे पक्ष 'स्थानिक' आणि 'बाहेरचे', जातीचे, धर्माचे असे राजकारण करतात ते एकमेकांशी संगनमतानेच आणि कामगार वर्गाला एक होऊ न देण्याचे काम करतात. तेव्हा कामगारांनो, **द्वेषाचे राजकारण सोडा, धर्म-जात-प्रांतापलीकडे मेहनत करणाऱ्या कष्टकरी वर्गाच्या एकजुटीचे राजकारण हाती घ्या!** आपला शत्रू इतर जिल्ह्यातील, राज्यातील, देशातील कामगार नाही, तर आपणा सर्वांना पिळवटून काढणारा सर्व देशांमधला, सर्व राज्यांमधला भांडवलदार मालक वर्ग आहे.

• संपादक मंडळ – निखील एकडे, बबन ठोके • संपादकीय कार्यालय- रूम नंबर 209, हीरानंदानी बिल्डिंग, 7-बी, लल्लुभाई कंपाऊंड, मानखुर्द (वेस्ट) मुंबई 400043
मो. नं. 8669735643 , 9619039793 • जागृति प्रिंटर्स, 12-ए, ग्राउंड फ्लॉर, भायखला सर्विसेज इंडस्ट्रीज, भायखळा, मुंबई येथे मुद्रित